




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक १८४ * नांदेड * शुक्रवार, दि. ११ जुलै २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# जनसुरक्षा विधेयक आवाजी मतदानाने मंजूर

## शहरी नक्षलवाद संपविण्यासाठी सरकारच्या हाती मोठं शस्त्र

**मुंबई (प्रतिनिधी)–** बहुचर्चित राज्य जनसुरक्षा विधेयक बहुमताने मंजूर करण्यात आलं आहे. शहरी नक्षलवाद आणि लोकशाहीविरोधी संघटनांचा बिमोड करण्यासाठी हे विधेयक मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत मांडलं होतं. तब्बल १२,५०० सूचनांचा अभ्यास करुन राज्य जनसुरक्षा विधेयक विधानसभेत सादर करण्यात आलं होतं. ते आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आलं आहे. या विधेयकाला डहाणूचे आमदार विनोद निकाले यांचा एकमेव विरोध होता. त्यामुळे बहुमताने हे विधेयक मंजूर झाल्याची घोषणा करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत जनसुरक्षा विधेयक मांडलं. शहरी नक्षलवादाला आळा घालण्यासाठी सरकारनं हे विधेयक आणलं आहे. डिसेंबर २०२४ मध्ये देखील हे विधेयक मांडण्यात आलं होतं. मात्र तेव्हा ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवण्यात आलं होतं.



संयुक्त समितीनं यामध्ये अनेक महत्त्वाचे बदल सुचवले होते. त्यातील बहुतांश बदल सरकारनं स्वीकारले, आणि विधेयकाची सुधारित अवृत्ती गुरूवारी मांडण्यात आली. कायदा आणि सुव्यवस्थेत व्यत्यय आणणाऱ्या कारवायांना आळा घालता यावा, आणि तसं करणाऱ्यांसाठी विशिष्ट कायदा असावा, यासाठी हे विधेयक आणण्यात आलं आहे.

सार्वजनिक सुव्यवस्थेस किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या संघटनांवर कडक कारवाई करण्यासाठी यामुळे सरकारच्या हाती अधिकार येणार आहेत. दरम्यान हा कायदा डाव्या विचारांच्या विरोधात नसून हिंसेचे समर्थन करणाऱ्या कट्टर विचारसरणीच्या विरोधात असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केलं.

जनसुरक्षा विधेयक संयुक्त समितीचा अहवाल माझ्याच्या हाती लागला. विरोधक आणि सामाजिक संघटनांच्या विरोधानंतर त्यामध्ये महत्त्वाचे बदल करण्यात आले. 'व्यक्ती आणि संघटना'ऐवजी 'कडव्या विचारांच्या तत्सम संघटना' असा शब्द त्यामध्ये नमूद करण्यात आला. या विधेयकाला १२ हजार ५०० सूचना, हरकती आल्या होत्या. त्याचा अभ्यास करुन मूळ विधेयकात तीन महत्त्वाचे बदल करण्यात आल्याची माहिती आहे. या विधेयकावर अनेक संघटनांनी आक्षेप घेतला होता. अखेर गुरुवारी हे विधेयक मांडण्यात आलं. दरम्यान जनसुरक्षा विधेयकाच्या वादानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंच्या अध्यक्षतेखाली संयुक्त समिती स्थापन केली. या समितीत सर्वपक्षीय २५ सदस्य आहेत. त्यामध्ये जितेंद्र आव्हाड, सतेज पाटील, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, शशिकांत शिंदे, अजय चौधरी सदस्य होते.

# बलुचिस्तानमधील १७ लष्करी तळांवर बीएलएफचा हल्ला

**बलुचिस्तान (वृत्तसंस्था)–** पाकिस्तानातस्वतंत्रबलुचिस्तानासाठी सुरु असलेला संघर्ष पुन्हा एकदा पेटला आहे. बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट (बीएलएफ) या बंडखोर संघटनेने मंगळवारी रात्री उशिरा बलुचिस्तानच्या अनेक जिल्ह्यांमध्ये पाकिस्तानच्या सरकारी आणि लष्करी प्रतिष्ठानांवर हल्ले केले. या गटाने ऑपरेशन बाम (डॉन) नामक मोहिमेद्वारे पाकिस्तानी राज्याविरुद्ध, दशकांपासून सुरू असलेल्या लढाईचा एक नवीन अध्याय सुरू केला आहे.

मिळालेल्या वृत्तानुसार, बंडखोर संघटना बीएलएफने या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे, या हल्लूयासह, संघटनेने पाकिस्तानविरुद्धची वर्षानुवर्षे सुरू असलेली लढाई पुन्हा सुरू केली आहे. वृत्तानुसार, पाकिस्तानच्या विविध भागात, पंजगुर, सुर्ब, केच आणि खारानमध्ये एकूण १७ हल्ले करण्यात आले. यामुळे पाकिस्तानला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले.

# गणेशोत्सव आता, महाराष्ट्र राज्य महोत्सव; विधानसभेत घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)–** लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या १०० वर्षाहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला महाराष्ट्र राज्य महोत्सव म्हणून गुरुवारी घोषित करण्यात आले.

राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी ही घोषणा विधानसभेत केली. विधानसभेत निवेदन करताना मंत्री आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव१८९३ साली लोकमान्य टिळकांनी सुरू केला, या उत्सवाची पार्श्वभूमी ही सामाजिक, राष्ट्रीय, स्वतंत्रता, स्वाभिमान, स्वभाषा या सगळ्यांशी संबंधित आहे. त्या पद्धतीनेच आज हा उत्सव देशभरात चालू आहे, महाराष्ट्राचा गौरव आणि अभिमान असावा असलेला आपला गणेशोत्सव आहे.

देशात नाहीतर जगात या गणेशोत्सवाची व्याप्ती, संस्कृती आणि प्रचार याबद्दल महाराष्ट्र सरकार कटीबद्ध राहील. काही लोकांनी वेगवेगळ्या कारणाने गणेशोत्सवाच्या सार्वजनिक परंपरेला कुठे ना कुठे परंपरागत गणेशोत्सव बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न विविध न्यायालयात जरूर केला. पण मला या ठिकाणी मुद्दामहुन उल्लेख करायचाय हे महायुतीचं सरकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात या सगळ्या निर्बंधांना,



आलेल्या स्पिड ब्रेकरला बाजूला करण्याचे काम अतिशय शीघ्रतेने केले. पीओपीच्या परंपरागत मुर्त्यांवर बंदी आणताना सीपीसीबीच्या गाईडलाईन्सचा तत्कालीन सरकारच्या काळातल्या सरकारने बाऊ केला गेला. त्यानंतर पीओपी मुर्त्यांच्या बाबतीमध्ये पर्यावरण पूरक अन्य पर्यायांना समोर ठेवून पीओपी पर्यावरणाला घातक आहे की नाही, या विषयावर सखोल अभ्यास करण्याची भूमिका आमच्या विभागाने घेतली. राजीव गांधी विज्ञान आयोगामार्फत काकोडकर समितीचा अहवाल घेतला. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादवजी यांनी संमती दिली आणि जे निर्बंध होते तेही बाजूला निघाले. न्यायालयाच्या निवाड्यानुसार पीओपी मुर्त्या बनवणे, डिस्प्ले करणे आणि विकणे यालाही परवानगी मिळाल्याचे आशिष शेलार यांनी सांगितले.

# जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दि. १० जुलै २०२५ रोजी दुपारी १२:५४ वाजता दिलेल्या सूचनेनुसार आज जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**या गोष्टी करा :** विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. तुमच्या स्मार्ट मोबाईल फोन मध्ये 'दामिनी', 'सचेत' हे दोन ॲप डाऊनलोड करा 'दामिनी' ॲप तुमच्या आजूबाजूला वीज विषयक संभाव्य धोके दर्शविते तर 'सचेत' ॲप मुळे तुम्हाला तुमच्या आजूबाजूच्या हवामानाविषयी अचूक इशारे व माहिती मिळते.

**या गोष्टी करु नका :** आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# आधार कार्ड नागरिकत्त्वाचा पुरावा नाही, सर्वोच्च न्यायालयात निवडणूक आयोगाचे उत्तर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आधार कार्ड नागरिकत्वाचा पुरावा नसल्याचे उत्तर निवडणूक आयोगाने गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात दिले. बिहारच्या मतदार याद्यांच्या पुनरावलोकनातून आधारकार्ड वगळण्यात आले आहे. त्यानुषंगाने उपस्थित प्रश्नाला उत्तर देताना निवडणूक आयोगाने उपरोक्त विधान केले आहे.

बिहारमधील आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदार याद्यांचे पुनराववलोकन करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या अनेक याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या मतदार यादी विशेष पुनरावलोकन वेळेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. न्यायालयाने निवडणूक आयोगाला सांगितले की, बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणांतर्गत नागरिकत्वाची तपासणी करायची होती, तर आयोगाने लवकर कार्यवाही करायला हवी होती.

तसेच गैर-नागरिक मतदार यादीत राहणार नाहीत, हे पाहण्यासाठी सघन प्रक्रियेद्वारे मतदार याद्या शुद्ध करण्यात काहीही गैर नाही. परंतु, प्रस्तावित निवडणुकीच्या काही महिने आधीच तुम्ही हा निर्णय घेता. बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षणामध्ये तुम्ही नागरिकत्वाच्या मुद्द्यात का पडत आहात ? हे गृहमंत्रालयाचे अधिकार क्षेत्र असल्याचे सुप्रीम कोर्टाने सांगितले. यावर निवडणूक आयोगाने सांगितले की, भारतीय संविधानाच्या कलम ३२६ अंतर्गत भारतात मतदार होण्यासाठी नागरिकत्वाची तपासणी करणे आवश्यक आहे. निवडणूक आयोगातर्फे ज्येष्ठ वकील राकेश द्विवेदी, के. के. वेणुगोपाल आणि मनिंदर सिंग यांनी बाजू मांडली.

# शंभूराज देसाई आणि अनिल परब थेट विधानपरिषदेत भिडले

**मुंबई (प्रतिनिधी)–** शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासामध्ये मिळणाऱ्या जेवणाच्या दर्जावरून थेट कर्मचाऱ्यांना बॉक्सिंग टाईप हाणामारी केल्यानंतर गुरूवारी विधान परिषदेमध्ये शिंदे गटाचे मंत्री शंभूराज देसाई आणि शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांच्या जोरदार खडाजंगी झाली.

अनिल परब यांनी मराठी माणसांच्या मुद्यावरून बोलताना शंभूरा देसाई यांनी गद्दारी केली असा उल्लेख करताच शंभूराजे यांचा पारा चांगला चढल्याचे दिसून आलं. त्यानंतर त्यांनी तू गद्दार कोणाला बोलतो? बाहेर ये तुला दाखवतो, तू बूट चाटत होतास असा एकेरी उल्लेख करत अनिल परब यांच्यावर हल्लाबोल केला. त्यामुळे या दोघांच्या वादामध्ये विधान परिषदेचे काम दहा मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले.

# कॉमेडियन कपिल शर्माच्या रेस्टॉरंटवर अंधाधुंद गोळीबार

## बब्बर खालसा इंटरनॅशनल संघटनेने घेतली जबाबदारी



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** कॉमेडियन कपिल शर्माच्या कॅफेवर गोळीबार झाला आहे. काही दिवसांपूर्वीच कपिल शर्मा नि कॅनडामध्ये त्यांच्या कॅफेचं उद्घाटन केलं होतं. कपिलने आपल्या पत्नी गिन्नी चतरथसोबत मिळून कॅनडामध्ये एक रेस्टॉरंट सुरू केलं आहे. दोघांनी ब्रिटिश कोलंबिया प्रांतातील सरे शहरात 'कॅप्स कॅफे' सुरू केलं होतं. या कॅफेचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या गोळीबारात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

बीकेआय (बब्बर खालसा इंटरनॅशनल) या संघटनेचा कार्यकर्ता आणि भारताच्या एनआयएकडून सर्वाधिक शोधात असलेला दहशतवादी हरजीत सिंग लाडी याने कपिल शर्माच्या काही वक्तव्यांचा हवाला देत या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारली आहे.

कपिल शर्माचा हा कॅफे कॅनडाच्या सरे भागात आहे. त्यांनी नुकतेच या कॅफेचे मोठ्या थाटामाटात उद्घाटन केले होते.

# २९ कलाकारांची ईडीकडून होणार चौकशी

**मुंबई (प्रतिनिधी)–** सक्तवसुली संचालनालय (ईडी) ने बेटिंग ॲप म्हणजेच सट्टेबाजीशी संबंधित मनी लाँडरिंग प्रकरणात २९ सेलिब्रिटींविरोधात कारवाई सुरू केली आहे. या प्रकरणात या २९ सेलिब्रिटींच्या विरोधात चौकशी सुरू झाली असून त्यांच्यावर आरोप आहे की त्यांनी या बेकायदेशीर बेटिंग ॲपचा प्रचार/प्रसार केला होता. ज्यांच्यावर संशय व्यक्त केला जात आहे. विजय देवरकोंडा, राणा दग्गुबाती, मंचू लक्ष्मी, प्रकाश राज, निधी अग्रवाल, अनन्या नगल्ला, श्रीमुखी या प्रमुख कलाकारांचा समावेश आहे.

# टेनिसपटू राधिका यादवची वडिलांनीच केली निर्घृण हत्या

## रील बनविण्याच्या कारणावरून झाला होता वाद, तीन गोळ्या झाडून संपवलं

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सध्या जग टेनिसच्या सर्वात प्रतिष्ठित ग्रँड स्लॅम, विम्बल्डन मुळे चर्चेत आहे आणि मोठ्या सेलिब्रिटींपासून ते अनेक चाहत्यांपर्यंत सर्वजण या स्पर्धेवर लक्ष ठेवून आहेत. यादरम्यान, भारतातून टेनिस विश्वाला हादरवणारी एक दु:खद आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. भारतीय टेनिसची उदयोन्मुख खेळाडू २५ वर्षांची राधिका यादव हिची तिच्याच वडिलांनी गोळ्या झाडून हत्या केल्याची घटना घडली.



भारतातील टेनिस जगतातून एक धक्कादायक बातमी आली आहे. गुरुवारी हरियाणातील गुरुग्राममध्ये टेनिसपटू राधिका यादवची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे वडिलांवर हत्येचा आरोप करण्यात आला आहे आणि त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

गुरुवारी सकाळी १०.३० च्या सुमारास २५ वर्षीय टेनिस खेळाडूच्या वडिलांनी तिला गोळी मारली. टेनिस खेळाडू तिच्या कुटुंबासह येथील सेक्टर ५७ मधील पहिल्या मजल्यावर राहत होती. तीन वेळा गोळ्या झाडल्यानंतर, राधिकाला गंभीर अवस्थेत एका खाजगी रुग्णालयात नेण्यात आले, जिथे तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सोशल मीडियावर रील बनवल्याबद्दल वडील राधिकावर रागावले होते. ज्यामुळे तिला गोळ्या झाडून मारले, अशी प्राथमिक माहिती समोर आले आहे.

# भारतविरूद्ध इंग्लंड क्रिकेट कसोटी सामना : पहिल्या दिवसाअखेर इंग्लंडच्या फक्त २५१ धावा

**लॉर्ड्स (वृत्तसंस्था)–** भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसरा कसोटी सामना गुरुवारपासून लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर खेळला जात आहे. तिसऱ्या कसोटीच्या पहिल्या दिवशी इंग्लंडने चार विकेट गमावून २५१ धावा केल्या आहेत. पहिल्या दिवसाच्या खेळाच्या अखेरीस जो रूट ९९ धावांसह आणि बेन स्टोक्स ३९ धावांसह खेळत आहेत. भारताकडून नितीश रेड्डी यांनी दोन विकेट घेतल्या.

प्रथम फलंदाजी करताना जॅक क्रॉली आणि बेन डकेट यांनी इंग्लंडला चांगली सुरुवात करून दिली. दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी ४३ धावांची भागीदारी झाली. ४० चेंडूत २३ धावा काढून बेन डकेट बाद झाला. जॅक क्रॉली ४३ चेंडूत फक्त १८ धावा करू शकला. नितीशने त्याच षटकात सलामीवीरांना बाद केले. १०४ चेंडूत ४४ धावा काढून ऑली पोप पॅव्हेलियनमध्ये परतला. रूट आणि पोप यांच्यात तिसऱ्या विकेटसाठी २११ चेंडूत १०९ धावांची भागीदारी झाली. हॅरी ब्रूकला (११) बुमराहने आऊट केले. जो रूट आणि बेन स्टोक्स आता खेळत आहेत. नितीश कुमार रेड्डीने दोन, रवींद्र जडेजा आणि जसप्रीत बुमराह यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.






# अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी रानभाजी महोत्सवाचे आयोजन

## रानभाजी महोत्सवात सहभागासाठी ११ ते १७ जुलैपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**किनवट (प्रतिनिधी)–** प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट कार्यालयामार्फत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी व बचतगटांसाठी जुलै ते सप्टेंबर या कालावधीत रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी लाभार्थ्यांनी ११ ते १७ जुलै २०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट येथील सेतू सुविधा केंद्रात नोंदणी करावी. तसेच या रानभाजी महोत्सवात जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी जेनित चंद्रा दोन्तुला यांनी केले आहे.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट जि. नांदेड या कार्यालयाचे कार्यक्षेत्र संपूर्ण नांदेड जिल्हा आहे. संपूर्ण जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना, महिला बचतगटांना केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना न्यक्लिअस बजेट योजना सन २०२५-२६ योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत गट क मधील सामुहिक लाभाच्या योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी स्थानिक परिसरामध्ये उपलब्ध रानभाज्यांचे जिल्हास्तरावर प्रदर्शन व विक्रीसाठी रानभाजी महोत्सवाचे आयोजन माहे जुलै ते सप्टेंबर या कालावधीत करण्यात येणार आहे.

या रानभाजी महोत्सवात प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट कार्यालयामार्फत स्टॉल उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. सर्व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना या रानभाजी महोत्सवात सहभाग घेवून परिसरातील रानभाजीचे विक्री करावयाची आहे.

# मुंबईत अधिवेशन सुरु असताना एकनाथ शिंदेंनी दिल्ली गाठली

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईत अधिवेशन सुरु असताना राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुपचूप दिल्ली गाठली. दिल्लीमध्ये एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या बड्या नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्याची माहिती समोर आली आहे. या गाठीभेटीमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दिल्लीवारी आणि केंद्रीय नेत्यांच्या भेटीमागचं कारण गुलदस्त्यात आहे. शिंदेंनी अचानक केलेल्या या दिल्लीवारीमुळे नेत्यांच्या भुवया उंचावल्या असल्याचं दिसून येत आहे. दरम्यान नियोजित असलेल्या कार्यक्रमामध्ये एकनाथ शिंदे यांनी मंत्री उदय सामंत यांना आणि इतर नेत्यांना पाठवल्याची माहिती आहे. तर या दौऱ्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे. मात्र यागचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी केंद्रातील अनेक बड्या नेत्यांशी भेट घेतली. मात्र, या दिल्लीवारीमागचं आणि केंद्रीय नेत्यांच्या भेटीमागचं नेमकं कारण अजूनही गुलदस्त्यात आहे. 'दिल्लीवारी



नेमकी कशासाठी हे अजून कळू शकलेलं नसलं तरी या दौऱ्यामुळे एक विशेष महत्त्व आलेलं आहे,' अशी माहिती समोर आली आहे. अधिवेशनाचा दुसरा आठवडा सुरू असताना आणि अनेक महत्त्वाची विधेयकं मांडली जात असताना हा दिल्ली दौरा झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. एकनाथ शिंदे यांनी आपले अनेक पूर्वनियोजित कार्यक्रम रद्द केले आणि त्याऐवजी उदय सामंत किंवा इतर नेत्यांना पाठवले होते. सुनील प्रभू यांच्यासह ५० नेत्यांची भेट घेतल्याची माहितीही समोर आली आहे. या भेटीगाठी आणि अचानक केलेल्या दिल्ली दौऱ्यामागचं कारण स्पष्ट होणं बाकी आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# बंकर बस्टर क्षेपणास्त्र: भारताच्या संरक्षणशक्तीतील महत्त्वाचा टप्पा

आज संपूर्ण जगामध्ये कोठे ना कोठे युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोठे शेती युद्ध आहे तर कोठे प्रगट युद्ध चालू आहे. जवळपास सगळी जनताच या दृष्टीने भयभीत झाली आहे. आज कोणत्याच राष्ट्राचा इतर राष्ट्रावर विश्वास राहिलेला नाही. जसा एका मानवाचा दुसऱ्यावर राहिलेला नाही. या परिस्थितीमध्ये आपल्या देशाचे संरक्षण करणे याला सर्वोच्च प्राधान्यता देणे गरजेचे झाले आहे. या दृष्टीने आपल्या देशाने देखील तयारी सुरू केली आहे. कारण आजचा काळ हा पारंपरिक युद्धांचा राहिलेला नाही. अचूक, वेगवान आणि यंत्रमानव-साहाय्यक तंत्रज्ञानाच्या आधारे लढवले जाणारे 'हायब्रिड वॉरफेअर' हेच युद्धाचे नवीन स्वरूप ठरत आहे. अमेरिका, चीन, रशिया यांसारख्या राष्ट्रांनी बंकर बस्टरसारख्या प्रणालींमध्ये गुंतवणूक करून आपल्या शत्रू राष्ट्रांच्या आतल्या आत घुसून त्यांच्या अत्यंत सुरक्षित संरचनांवर हल्ले करण्याचे तंत्र विकसित केले आहे. भारतही आता अशा प्रकारच्या युद्धनीतीकडे वळत आहे. भारताची संरक्षण तंत्रज्ञान क्षेत्रातील वाटचाल आता निर्णायक वळणावर आली आहे. 'अग्नि-५' या आंतरखंडीय क्षेपणास्त्राच्या सुधारित आवृत्तीची नुकतीच घोषणा झाली असून, या आवृत्तीत बंकर बस्टर बॉम्ब वाहून नेण्याची क्षमता असणार आहे. हे केवळ एक तांत्रिक उन्नतीचे उदाहरण नसून, बदललेल्या जागतिक युद्धनीतीत भारताचे स्थान काय असावे, याचा एक स्पष्ट संदेश आहे. 'बंकर बस्टर' हे पारंपरिक बॉम्बपेक्षा वेगळे अस्त्र आहे. हे बॉम्ब खास खोल जमिनीत, विशेषतः दगडी संरचनांमध्ये लपवलेली लक्ष्ये नष्ट करण्यासाठी तयार केले जातात. या बॉम्बमधील स्फोटक सामुग्री आणि त्याची रचना अशी असते की, ते जमिनीखालील ८० ते १०० मीटर खोल जाऊनही प्रभावीपणे लक्ष्यावर मारा करू शकते. अमेरिकेने इराणमधील फोर्डो अणुकेंद्रावर या बंकर बस्टर बॉम्बने केलेला हल्ला हे याचेच ताजे उदाहरण आहे. भारत याच धर्तीवर स्वतःचे 'बंकर बस्टर' क्षेपणास्त्र विकसित करत असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. भारताची संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओ ही सुधारित क्षेपणास्त्र प्रणाली विकसित करत आहे. अग्नि-५ ची ही नव्या स्वरूपातील आवृत्ती केवळ जमिनीवरच्या नव्हे तर जमिनीखालच्या संरक्षणात्मक तळांवर अचूक हल्ला करू शकते. हे क्षेपणास्त्र सुमारे ७,००० किलो वजनाचे बंकर बस्टर बॉम्ब वाहून नेऊ शकते, ही बाब भारताच्या सध्याच्या क्षेपणास्त्र क्षमतेसाठी एक मोठा टप्पा आहे. भारतातील संरक्षणतज्ज्ञांचे असे मत आहे की, पाकिस्तान व चीनसारख्या शेजारी देशांमध्ये असलेल्या क्षेपणास्त्र तळांवर किंवा आण्विक व सैनिकी अड्ड्यांवर नेमकेपणाने हल्ला करण्यासाठी बंकर बस्टर क्षेपणास्त्र उपयुक्त ठरतील. या शत्रूराष्ट्रांनी आपले महत्त्वाचे अड्डे जमिनीत खोलवर बांधले आहेत. त्यामुळे सामान्य क्षेपणास्त्रांपेक्षा विशेष क्षमतेच्या बंकर बस्टरचा वापर आवश्यक ठरतो. अशा अत्याधुनिक क्षेपणास्त्र प्रणालींचा विकास केल्याने युद्धात खर्चाचे प्रमाण तुलनेने कमी राहते, तर त्याचे परिणाम अधिक प्रभावशाली असतात. पारंपरिक सैनिकी कारवाया जिथे प्रचंड मानवी व आर्थिक संसाधनांची मागणी करतात, तिथे बंकर बस्टरसारखी प्रणाली अत्यंत मोजक्या हल्ल्यांद्वारे मोठ्या परिणामांची शक्यता वाढवते. भारताचे बंकर बस्टर क्षेपणास्त्र विकसित करणे हे केवळ सैनिकी दृष्टीने महत्त्वाचे नाही, तर यामधून एक ठाम राजनैतिक संदेशही जातो. आपण शांतताप्रिय राष्ट्र आहोत, मात्र आपल्याला जर सुरक्षा धोक्यात आणण्याचा प्रयत्न झाला, तर भारताकडे मजबूत प्रत्युत्तर देण्याची क्षमता आहे. विशेषतः इराण-अमेरिका व चीन-तैवान यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताने आपल्या सुरक्षेच्या बाबतीत कुठलीही ढील न देता, निर्णयक्षम व सज्ज असले पाहिजे. 'अग्नि-५' ची बंकर बस्टर क्षेपणास्त्र वाहून नेण्याची क्षमता ही केवळ एक संरक्षणतांत्रिक प्रगती नसून, ती भारताच्या आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेले एक भक्कम पाऊल आहे. जागतिक पातळीवर संरक्षणाची समीकरणे झपाट्याने बदलत असताना भारतानेही त्यात स्वतःला सिद्ध करत पुढे जाणे गरजेचे आहे. ही सुधारित क्षेपणास्त्र प्रणाली हे भारताच्या सामरिक शक्तीचे आणि युद्धतंत्रातील दूरदृष्टीचे प्रतीक ठरणार आहे. आता ही ताकद केवळ प्रतिकारासाठी नाही, तर आंतरराष्ट्रीय स्थैर्य आणि शांततेसाठी एक जबाबदार शक्ती म्हणून भारताचे स्थान अधोरेखित करणारी ठरेल.

# लोकसंख्या वाढीमुळे निसर्गाचा ऱ्हास आणि सर्वांनाच भोगावा लागेल त्रास

लोकसंख्या अशीच वाढत राहिली तर निसर्गाचा ऱ्हास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास जगातील प्रत्येक व्यक्तीला, संपूर्ण जीवजंतूला व वन्य प्राण्यांना भोगावाच लागेल. वाढत्या लोकसंख्येचा धोका पहाता जागतिक स्तरावर लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. लोकसंख्या वाढ ही जगातील प्रत्येक देशाच्या विकासामध्ये व्यत्यय निर्माण करीत असते. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाच्या उद्देशाने ११ जुलै १९८७ ला जागतिक लोकसंख्येचा विचार केला तर ५०० कोटी लोकसंख्या असल्याचे लक्षात आले. ही बातमी जगभर पसरली. त्या उद्देशाने लोकसंख्या नियंत्रणासाठी वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात येऊ लागले.

संयुक्त राष्ट्र संघाच्या विकासविषयक कार्यक्रमाच्या (युएनडीपी) गव्हर्निंग कौन्सिलने ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन जगभर साजरा केला जावा अशी शिफारस केली. या शिफारशी- नुसार ११ जुलै १९८९ पासून ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. जगाची लोकसंख्या १९८७ ला ५०० कोटी होती. यानंतर २०१९ मध्ये ७७० कोटींवर पोहोचली. यात सर्वाधिक लोकसंख्या आशिया खंडात ४४६.२७ कोटी असल्याचे दिसून आले. यानंतर आफ्रिका, युरोप, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया व अंटार्टिका अशा पद्धतीने या खंडात लोकसंख्येचा क्रमवार होता. भारताचा विचार केला तर १९५१ साली फक्त ३६ कोटी लोकसंख्या होती. ती आजच्या घडीला १४० कोटीच्यावर गेली आहे. हा भारतासाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. २०१४ च्या आकडेवारीनुसार सर्वाधिक लोकसंख्या असणारे देश याप्रमाणे प्रथम चीन, भारत, अमेरिका, इंडोनेशिया, पाकिस्तान, ब्राझील, नायजेरिया, बांगलादेश, रशिया व जापान ४३८ कोटी लोक या दहा देशात रहातात. हा आकडा जागतिक लोकसंख्येच्या ५७ टक्के इतका आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे

आज संपूर्ण जगात लोकसंख्या वाढीचा विचार केला तर भारताच्या भूभागाच्या तुलनेत लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर आहे आणि चीनच्या भूभागाच्या तुलनेत चीन लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या घरात आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.



भारतातील लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रत्येक राज्यांनी पुढाकार घ्यायला पाहिजे व मुख्यत्वेकरून सर्वच मुख्यमंत्र्यांनी याकडे जातीने लक्ष घालायला हवे. त्याचबरोबर पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष व पक्ष-विपक्षांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी पुढाकार घ्यायला हवा. वाढती लोकसंख्या संपूर्ण देशालाच नाही तर संपूर्ण जगाला घातक ठरत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक देशांना कठोर परिस्थितीशी सामना करावा लागत आहे. यामुळे बेरोजगारी, भूकमारी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महागडे शिक्षण, उपासमार, कुपोषण, पाणी टंचाई, इंधन, आरोग्य-विषयक सुविधांचा अभाव, औषधांची समस्या, मूलभूत सुविधांचा अभाव इत्यादींचा सामना आज सर्वांनाच करावा लागत आहे.

वाढती लोकसंख्या प्रत्येक देशाला विकासापासून वंचित करण्याचे कार्य करीत असते, याकरिता प्रत्येक देशाचे दायीत्व बनते की, लोकसंख्या नियंत्रण काळाची गरज आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटतो व देश डबघाईस येतो. देशाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहरीकरणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्याचप्रमाणे औद्योगिकीकरण व उद्योग-धंदे मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लोकांच्या राहण्याच्या व्यवस्थेकरिता मोठ्या प्रमाणात जंगल संपत्तीचा विनाश होत आहे.म्हणजेच लोकसंख्या वाढीमुळे जंगलसंपदा संपुष्टात येत आहे. त्यामुळे आज जंगलातील हिंसक प्राणी शहरांकडे धाव घेताना दिसतात.

भारतातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता यावर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. वाढत्या लोकसंख्येचे विक्राळ रूप पाहता आता भारत सरकारने एक परिवार, एकच अपत्य, असा कायदा सर्वांसाठी अमलात आणावा मग तो व्यक्ती कोणत्याही धर्माचा असो. यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवता येईल व देशाचा विकास होईल. अन्यथा भारतात अशीच लोकसंख्या वाढत राहिली तर माणूस माणसाला मारल्या शिवाय रहाणार नाही. कारण वाढत्या लोकसंख्ये-मुळे देशाच्या विकासासाठी अनेक अडथळे निर्माण होतांना दिसतात.

भारतात लोकसंख्या इतकी झपाट्याने वाढली आहे की, अनेक लोक फुटपाथवर झोपतांना दिसतात, नदीच्या काठावर घरे, रेल्वे रूळाजवळ घरे, तलावाच्या काठावर घरे अशा दुर्घटना स्थळी मोठ्या प्रमाणात झोपड्या पहायला मिळतात हा संपूर्ण प्रकार लोकसंख्या वाढीचा आहे. आज जगाला लोकसंख्या वाढीपेक्षा वृक्ष वाढविण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष तोडीमुळे सूर्य आग ओकत आहे. आज पृथ्वी लोकसंख्या वाढीच्या भाराखाली दिवसेंदिवस दबत आहे. त्यामुळे आज लोकसंख्या वाढीपेक्षा निसर्ग वाढीवर भारतासह संपूर्ण जगाने जास्त भर दिला पाहिजे. निसर्गाचा ऱ्हास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास दिवसेंदिवस संपूर्ण जगाला होत आहे. याला कोठेतरी रोखले पाहिजे.

मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी सुख-समाधानासाठी लोकसंख्या वाढविली आहे. त्यामुळे आज हिंसक प्राणी मानवावर आक्रमण करताना दिसतात, यामुळे मनुष्य व प्राणी यांच्यात वैरत्व निर्माण झाले आहे. ही परीस्थिती मानवाने स्वत:हुन ओढावली आहे. मानवाच्या अतीरेकामुळे आज पृथ्वीचे संतुलन डगमगतांना दिसत आहे. त्याचबरोबर समुद्राची पातळी दरवर्षी सरासरी ३.५ मिलिमीटरने वाढत आहेच, सोबतच पाण्याचे उष्णतामान सुध्दा वाढत आहे. म्हणजेच दिवसेंदिवस पृथ्वीचा भूभाग धोकादायक स्थितीमध्ये मानवाने आणल्याचे दिसून येते. कोविड-१९ महामारी ही सुध्दा मानवाच्या अतिरेकाचे कारण आहे. चीनमध्ये एवढी लोकसंख्या वाढली आहे की, तेथील लोक समुद्र किनाऱ्यावर रहातात. त्यामुळे चीन विस्तारवादाचे घृणीत कृत्य करतांना दिसतो. हा संपूर्ण प्रकार चीनच्या वाढत्या लोकसंख्येमुळे उद्भववलेला आहे.

चीनच्या विस्तारवादाच्या भूमिकेमुळे जगातील अनेक देश चीनच्या विरोधात गेले आहेत. म्हणजेच लोकसंख्या वाढीचा एवढा घातक परिणाम होत आहे की, मानव एकमेकांवर बंदुक ताणुन बारूदच्या ढिगाऱ्यावर बसला आहे. यावरून स्पष्ट होते की, लोकसंख्या वाढीमुळे जग भूईसपाट व्हायला काहीच वेळ लागणार नाही. त्यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे प्रत्येक देशाचे प्रथम कर्तव्य असायला पाहिजे. आज लोकसंख्या वाढीमुळे भारताच्या दरडोई उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.वाढती लोकसंख्या पहाता अनेक व्यापारीवर्ग भेसळयुक्त पदार्थ, कार्बाइडने पिकविलेली विषारीयुक्त फळे, भेसळयुक्त दूध इत्यादी अनेक विषारी वस्तूंचा वापर लोकांना करावा लागतो. यामुळे घातक आजार सुध्दा होऊ शकतात आणि होत आहेत. यामागचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय. अनेक कारणांवरून असे दिसून येते की वाढत्या लोकसंख्येमुळे भारतासह अनेक देशांमध्ये विक्राळ रूप धारण केले आहे. याला रोखण्यासाठी कठोर पावले उचलण्याची नितांत गरज आहे. जगात व देशात वाढत्या प्रदूषणाला जबाबदार, वाढती लोकसंख्याच आहे. लोकांच्या सुख-सुविधांकरिता विमान वाहातुक, रोड वाहतूक, रेल्वे वाहतूक व इतर वाहतूक इत्यादी मोठ्या प्रमाणात वाहने धावतांना दिसतात, यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याचा परिनाम असा होत आहे की, अनेक आजारांना खुले आमंत्रण दिल्या जात आहे. त्यामुळे ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिन लक्षात घेता देशातील सर्व राज्यांनी व केंद्र सरकारने वाढती लोकसंख्या नियंत्रणासाठी युध्दपातळीवर प्रयत्न केले पाहिजेत. काही राजकीय पक्ष आपला धर्म धोक्यात आहे, आपल्या धर्माची लोकसंख्या कमी होत आहे असे सांगून धर्माचे काही ठेकेदार लोकसंख्या वाढविण्याचा सल्ला देतात. अशांवर राज्य व केंद्र सरकारने ताबडतोब कठोर कारवाई केली पाहिजे.

मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे. त्यामुळे मानवाने संपूर्ण सीमारेषांचे उल्लंघन केल्याचे दिसून येते. मानवाच्या बुध्दीजीवीपणामुळे आज निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या पशु-पक्ष्यांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय. भारताने लोकसंख्येवर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर पुढे चालून अनेक कठीणायीचा सामना करावा लागेल हेही तेवढेच सत्य आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्या अशीच झपाट्याने वाढत राहिली तर कोणतेही सरकार लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकणार नाही.त्यामुळे आताच सावधगिरीचे उपाय योजले पाहिजेत व लोकसंख्येवर नियंत्रण आणले पाहिजे. लोकसंख्यावाढीमुळे भारतासह जगात केव्हाही महाप्रलय येऊ शकतो हे सरकारने व जनतेने लक्षात ठेवले पाहिजे.जगातील लोकसंख्या अशाच वेगवान गतीने वाढत राहिली तर मानवाच्या उष्णतेमुळे आणि अतिरेकामुळे शिखरातील बर्फ आपोआप वितळायला सुरूवात होईल व समुद्राची पातळी आपोआप वाढत जाईल याला नाकारता येत नाही. त्यामुळे लोकसंख्येच्या बाबतीत सावधान होणे गरजेचे आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार व पक्ष-विपक्षाचे राजकीय पुढारी यांना आग्रह करतो की, लोकसंख्या नियंत्रणासाठी सर्वो तोपरी कठोर पाऊल उचलण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे. जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून जगातील प्रत्येक देशाने आजच्या घडीला वृक्षारोपण करून करोडो झाडे लावण्याचा संकल्प करावा.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# लोकसंख्या वाढ चिंताजनक!

आज दि. ११ जुलै, 'जागतिक लोकसंख्या दिवस'. लोकसंख्यावाढीचे दुष्परिणाम सर्वत्र जाणवू लागल्याने वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या अन्न, वस्त्र, निवारा, बेकारी, वाहतूक, रोगराई आदी समस्यांविषयी लोकांच्या मनात जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी जगभरात ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. समाजशास्त्रज्ञांच्या मते 'कोणत्याही देशाची लोकसंख्या ही त्या देशाचा भूप्रदेश आणि जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या साधनांपेक्षा जास्त असता कामा नये.' वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असून, यांतून निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांवर पर्याय काढून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी जनजागृती करणे अगत्याचे झाले आहे.

लोकसंख्या म्हणजे मानव प्रजातीची एकूण संख्या. आज वाढती लोकसंख्या ही जगासमोरील भीषण समस्या असून, जगभरात दर सेकंदाला सरासरी चारपेक्षा जास्त बालके जन्माला येत आहेत. १ जानेवारी २०२३ रोजी जगाची लोकसंख्या ७ अब्ज ८६ कोटी ८८ लाख होती तर २०२५ पर्यंत हा आकडा ८ अब्जावर जाणार असल्याचे अंदाज वर्तवले जात होते. आज अहवालानुसार भारताने १४२ कोटी लोकसंख्येसह चीनला मागे टाकून जगात लोकसंख्येच्या बाबतीत प्रथम स्थान पटकावले आहे. लोकसंख्या वाढीमुळे नैसर्गिक साधन संपत्तीवरील ताण वाढत असून, ती संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे लक्ष वेधले जावे, त्यावर विचारमंथन व्हावे आणि लोकसंख्या नियंत्रणासाठी नवनवीन प्रयत्न व्हावेत या उद्देशाने दरवर्षी जगभरात ११ जुलै हा दिवस लोकसंख्या दिन म्हणून एका विशिष्ट विषयाभोवती साजरा केला जातो.



यावर्षीचा जागतिक लोकसंख्या दिन आपल्या जगाच्या अनंत शक्यतांना अनलॉक करण्यासाठी महिला आणि मुलींचा आवाज उठवणे या विषया भोवती (थीम) साजरा केला जात आहे. ही थीम महिलांसाठी समान हक्काचे महत्व अधोरेखित करते. यातून महिलांच्या गरजा लक्षात घेणे किती महत्त्वाचे असून, हा दिवस महिलांना त्यांच्या पूर्ण क्षमतेची जाणीव करून देण्यासाठी आणि त्यांना सक्षम करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करू शकणार आहे. ११ जुलै १९८७ रोजी जगातील पाच अब्जावे बालक युगोस्लाव्हियामध्ये जन्माला आले ज्याची जगभरात चर्चा झाली आणि वाढत्या लोकसंख्येबाबत जनमानसात जागृती निर्माण झाली. युनोने याची दखल घेत १९८९ सालापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिवस म्हणून घोषित केला.

लोकसंख्येच्या अनियंत्रित वाढीमुळे अतिशय जटील अशा सामाजिक आणि पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या असून, वाढते शहरीकरण, वाढते प्रदूषण, बेरोजगारी, गरिबी, अन्नधान्याची कमतरता, वाढती गुन्हेगारी, आरोग्य असुविधा, दरडोई कमी होत चाललेले जमिनीचे क्षेत्र आदी समस्यांपासून सुटका करण्यासाठी देशात कठोर कायद्यांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे असे वाटते.

अमेरिकेचे क्षेत्रफळ भारताच्या तीनपट असून, लोक-संख्या मात्र भारताच्या लोकसंख्येच्या पंचवीस टक्के आहे.

लोकसंख्या वाढीचा वेग जर वेळीच रोखला गेला नाही तर माणूसच पृथ्वीवरील जीवनाच्या नाशास कारणीभूत ठरेल, असा गंभीर इशारा लोकसंख्या शास्त्रज्ञांनी दिला आहे. तेव्हा लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने देशाच्या विकासास खीळ घालणाऱ्या या वाढत्या लोकसंख्येला आटोक्यात आणण्यासाठी सामुहिक प्रयत्न करण्याचा संकल्प करणे उचित ठरेल. त्यासाठी कुटुंबनियोजनाचे महत्त्व, लिंग समानता, माता आणि शिशु आरोग्य, लैंगिक शिक्षण, संततीनियमनाच्या साधनांचा वापर, प्रजननविषयक आरोग्याची माहिती, किशोरवयातील गर्भारपण टाळणे, बालविवाह टाळणे, मुलींना शिक्षण आदी उपाययोजना या क्षेत्रातील तज्ज्ञांनी सुचविल्या आहेत. तेव्हा या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन लोकसंख्या नियंत्रणाचा संकल्प करूया. आठ अब्जांच्या जगात, शक्यतेसाठी नेहमीच जागा असणे आवश्यक आहे.

**- प्रा. विजय कोष्टी**
कवठेमहांकाळ' जि. सांगली

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज



आज ११ जुलै आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. १९८७ ते २०२१ म्हणजे अवघ्या चोवीस वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात कोटींपर्यंत पोहचली याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. दोन वर्षापूर्वीच भारताने चीनला मागे सारून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. तीन वर्षापूर्वीच तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. तीन वर्षापूर्वी म्हणजे २०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या चिनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे असेही नमूद करण्यात आले आहे.

आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११० कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्रय असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे.

लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून, विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही.

लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिढीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पिढीला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जाने वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पिढीला समजावून सांगावे लागेल.

देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वानाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पिढीला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# पीक कापणी, काढणी पश्चात नुकसान भरपाईचे वाटप प्रगतीपथावर

## कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांची माहिती

**मुंबई** – प्रधानमंत्री पीक विमा योजनेत परभणी जिल्ह्यात सन २०२४–२०२५ या पीक हंगामाकरिता मंजूर असलेल्या ४४३.५० कोटी रकमेपैकी ४१८.२५ कोटी रुपयांची नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम वाटपाची कार्यवाही सुरू असून पीक कापणी व काढणी पश्चात नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही प्रगती-पथावर असल्याची माहिती कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनांच्या उत्तरात दिली.

विधानसभा सदस्य राजेश विटेकर यांनी यासंदर्भातील लक्ष-वेधी सूचना विधानसभेत मांडली. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत सदस्य रोहित पवार यांनी उपप्रश्न विचारून सहभाग घेतला.

परभणी जिल्ह्यात स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित क्षेत्रासाठी मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थितीकरिता २९९.२४ कोटी नुकसान भरपाई निश्चित केली. यापैकी २९८.७८ कोटीचे वाटप करण्यात आल्याचे कृषीमंत्री कोकाटे यांनी सांगितले.

परभणी जिल्ह्यात आयसीआयसीआय लोंबार्ड या विमा कंपनीच्या माध्यमातून पीक विमा योजना राबविली जात आहे. सन २०२४–२०२५ मध्ये परभणी जिल्ह्यात काही बाधित शेतकऱ्यांना विमा रक्कम मिळाली नसल्याच्या लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झाल्या. त्यानुसार लोकप्रतिनिधी, बाधित शेतकरी, विमा कंपनीचे प्रतिनिधी, कृषी विभागाचे अधिकारी यांची बैठक घेण्यात आली. परभणी जिल्ह्यात पीक विमा संदर्भात नाकारलेली ७ हजार ९६१ प्रकरणे नियमानुसार तपासून विमा कंपनीने ग्राह्य धरली असून या प्रकरणापोटी देय असलेली सुमारे १७ कोटीची नुकसान भरपाई रक्कम येत्या पंधरा दिवसात संबंधित शेतकऱ्यांना दिली जाईल, असेही कृषी मंत्री कोकाटे यांनी यावेळी सांगितले.

## थोडक्यात...

### डी.के. पाटील महाविद्यालयात समुपदेशन सुविधा केंद्र उपलब्ध

**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा येथील डी.के.पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या सुविधा केंद्रास महाराष्ट्र शासनाच्या सीईटी सेलने समुपदेशन केंद्र तसेच सुविधा केंद्राचा दर्जा प्रदान करत मान्यता दिली आहे. विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशाबाबत मार्गदर्शनासाठी व योग्य ती प्रक्रिया पार पाडण्यासाठी, कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी हे सुविधा केंद्र उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेसाठी विविध ठिकाणी न जाता एकाच परिसरामध्ये प्रवेश प्रक्रिया सुरळीत करणे हा या केंद्राचा हेतू आहे. बी. फार्मसी, व एम. फार्मसी यासाठी हे सुविधा केंद्र आहे, केंद्रात विद्यार्थ्यांना निशुल्क सुविधा देण्यात येईल व त्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येणार नाहीत यासाठी हे सुविधा केंद्र उपलब्ध करून दिले आहे, अशी माहिती सुविधा केंद्राचे समन्वयक प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर यांनी दिली.

### भाजप दक्षिण ग्रामीण मंडळाच्या सरचिटणीसपदी माधव वाघमारे

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पक्षाकडून ग्रामीण मंडळाच्या सरचिटणीसपदी माधव वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे.



मागील अनेक दिवसांपासून भारतीय जनता पार्टीमध्ये विविध पदावर सक्रीय काम करून पक्ष संघटन वाढीस प्रयत्न करणारे माधव वाघमारे यांच्या कार्याची दखल घेऊन भाजपचे दक्षिण तालुका अध्यक्ष विश्वंभर पाटील शिंदे यांच्या शिफारशीवरून ही निवड करण्यात आली आहे. माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण, भाजपचे महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर, संघटन मंत्री संजय कौडगे यांच्यासह आदींचे वाघमारे यांनी आभार मानत आगामी काळात पक्षसंघटन वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

# लोह्यात अनेक वार्डातील नाल्यावरील पुल तुटले; येणे-जाणे झाले अवघड



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा शहरातील अनेक वार्डातील नाल्यावरील बांधण्यात आलेले पुल तुटल्याने रहिवाशांना ये-जा करणे अवघड होऊन बसले आहे.

मागील दोन वर्षांपासून पालिकेवर प्रशासक राज असल्या मुळे विकास कामांची गती रखडली असून विकासकाम मार्गी लागेल अशी आशा असताना ती फोल ठरत असल्याचे दिसून येत आहे. फुटलेल्या नाल्यावरील पुलामुळे मोठे वाहने चालविणे कठीण बनले आहे. शहरातील अनेक भागातील अंतर्गत रस्त्यावरील नाल्यांवरती पूल टाकून रस्ते बनविण्यात आले आहेत. मात्र सदरील रस्त्यावर असलेल्या नाल्यावरील पूल तूटल्याने त्या भागातील रहिवाशांना ये-जा करणे, तसेच त्यांची वाहने घेऊन जाणे कठीण बनले असताना पालिका प्रशासनाकडून सदरील पूल दुरुस्त करण्यास दिरंगाई होत असल्याने पालिका प्रशासनाविरुद्ध लोहा वासियांच्या मनात प्रचंड संताप आहे. शहरातील अत्यंत वर्दळीचा भाग असलेल्या शिवकल्याण नगरातील दवाखाना लाईन परिसरात नाल्यावरील पुल पूर्णपणे तुटून पडल्याने त्या भागातील वाहतूक ठप्प झाल्याने पर्यायी मार्ग म्हणून वाहनधारक मागील अनेक दिवसांपासून सराफा मार्केटमधून वाहने घेऊन जात आहेत. सदर भागातील व्यावसायिक व्यापारी तसेच दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांना सदरील रस्त्याच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

तुटलेल्या पुलामुळे रात्री बेरात्री येणाऱ्या वाहनांचा आणि पादचाऱ्यांचा अपघात होण्याची शक्यता असल्याने सदरील फुटलेल्या नालीवरील पूल तत्काळ दुरुस्त करावी अशी मागणी परिसरातील रहिवाशी व व्यापारी मंडळीतून होत आहे.

## वृक्षदिंडी, वृक्षारोपण व वृक्षांचा वाढदिवस; इंदिरानगरच्या जि.प.शाळेचा अभिनव उपक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)–** इंदिरानगरच्या जिल्हा परिषद शाळेत वृक्षदिंडी, वृक्षारोपण करत वृक्षांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

अर्धापूर तालुक्यातील इंदिरानगर येथील जि.प. शाळेत ३५ झाडांना एक वर्ष पूर्ण झाल्याने त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी कोणी रंगीबेरंगी फुले आणली तर कोणी रंगीबेरंगी फुगे. मुलींनी नऊवार साडी घालून मराठमोळी वेषभूषा केली होती. मुले वारकरी वेषात होती. कोणी शाळेच्या मैदानातील झाडांना फुगे लावत होती, तर कोणी झाडांना प्रिय वृक्षराज वाढदिवसाच्या मनः पूर्वक शुभेच्छा, हॅप्पी बर्थ डे माय ट्रीचे नेमप्लेट लावून सजावट करत होते. तसेच एक पेड माँ के नाम २.० अंतर्गत वृक्षारोपण करण्यासाठी आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडीचे पण आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे बच्चे कंपनी भलतीच खुश होती, त्यामुळे शाळेतील वातावरण आनंदी, उत्साही व प्रसन्न होते.

सर्वप्रथम गावातील मुख्य रस्त्याने 'झाडे लावा झाडे जगवा'चा जयघोष करीत वृक्षदिंडी काढण्यात आली. त्यानंतर शाळेच्या आवारात जवळपास ५० वृक्षांची लागवड करण्यात आली. तदनंतर मुलांच्या आवडत्या कार्यक्रमाला म्हणजे झाडांच्या वाढदिवसाला सुरुवात झाली. बर्थडे आहे, भावाचा जल्लोष साऱ्याा गावाचा या गीतावर मुलांनी ठेका धरला व केक कापून व चॉकलेट वाटून वाढदिवस धूमधडक्यात व उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर एक पेड माँ के नाम १.० अंतर्गत गेल्या वर्षी लावलेल्या झाडांचे वर्षभर संगोपन करून यशस्वीरित्या वृक्षसंवर्धन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सरपंच, शिक्षणविस्तार अधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते वही भेट देवून कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी शेलगाव (बु.) चे सरपंच हनुमान पाटील राजेगोरे, शिक्षणविस्तार अधिकारी गजानन सोनटक्के, ग्राम पंचायत व शाळा व्यवस्थापन समितीचे कार्यकुशल सदस्य गजानन पांचाळ, शाळा व्यवस्थापन समितीचे कृतीशील अध्यक्ष सुनिल घोडे तसेच समितीचे सक्रीय माजी अध्यक्ष पांडुरंग आठवले, समितीचे कार्यतत्पर सदस्य संदिप नागोराव घोडे, संजय घोडे, संदिप अशोकराव घोडे, खंडोजी राजेगोर आदींची उपस्थित होती.

सदरील कार्यक्रम केंद्रप्रमुख विनोद देशमुख व मु.अ. ए.जी. सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश्वर गायकवाड यांच्या कल्पकतेतून व पुढाकारातून तसेच सहशिक्षक बैनवाड एम.एस., ज्ञानेश्वर पारखे, आजम शेख यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पडला.

## ग्रामीण पोलीस स्टेशन येथील तीन पोलीस अंमलदार यांना सहायक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती





**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण पोलीस स्टेशन येथील तीन पोलीस हेड कॉन्स्टेबल यांना सहायक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस निरीक्षक रोकडे यांच्या हस्ते फित लावण्यात आले.

जिल्हा पोलीस मुख्यालय येथून पदोन्नती समितीच्या दि.२ जुलै २५ झालेल्या बैठकीच्या निर्णयानुसार पोलीस अंमलदार यांना या कार्यालयाचे आस्थापनेवरील रिक्त असलेल्या पदात सेवा जेष्ठतेनुसार सदर आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सहायक पोलीस उपनिरीक्षक यापदावर जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी एका आदेशानुसार पदोन्नती दिली असून यात ग्रामीण पोलीस स्टेशन येथील पोहेकॉ संभाजी शेषेराव व्यवहारे, विक्रम बालाजी वाकडे, महंमद मजहर हुसेन शेख यांना सहायक पोलीस उपनिरीक्षकपदी तर पोलीस नायक ते पोलीस हवालदारपदी माधव डफडे, अमोल भोकरे, यांना पदोन्नती मिळाली आहे. पदोन्नती प्राप्त सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस निरीक्षक रोकडे, सहायक पोलीस निरीक्षक सचिन गढवे, विजय कांबळे, उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, बाबुराव चव्हाण, गायकवाड, पोलीस कर्मचारी भारती, शिवानंद कानगुले, सय्यद इब्राहिम, महाजन, शेट्टे, केंद्रे, मेकलवाड, सुनिल गटलेवार, टरके, बालाजी दंतापल्ले, कौठेकर, आडे, बनसोडे, वनंजे, घोणशेटवार, सुनिल गरदनमारे, भातोनकर यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पदोन्नती प्राप्त पोलीस कर्मचारी यांच्या ग्रामीण पोलीस स्टेशन यांच्यावतीने पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस निरीक्षक रोकडे व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## जिल्हा कृषी अधिक्षक कळसाईत यांनी लोहा तालुक्यातील पिकांची केली पाहणी



**लोहा (प्रतिनिधी)–** जिल्हा मासिक चर्चासत्र व प्रक्षेत्र भेट अंतर्गत तालुक्यातील शेत शिवारातील पिकांची पाहणी करण्यासाठी जिल्हा कृषी अधिक्षक दत्तकुमार कळसाईत व कृषी शास्त्रज्ञ यांनी तालुक्यातील अनेक गाव शिवारातील पिकांची पाहणी केली.

तालुक्यातील लोहा शिवारसह सायाळ, दापशेड, बेरळी, बेनाळ, रायवाडी आदी शेत शिवारातील पिकांची पाहणी केली. तालुक्यातील सायाळ येथील शेतीनिष्ठ शेतकरी रत्नाकर पाटील ढगे तसेच दापशेड येथील नैसर्गिक शेती करणारे शेतकरी विश्वनाथ होळगे यांच्या शेतातील पिकांची पाहणी केली. सायाळ येथे पारडी येथील महिला शेतकरी गटांनी उपस्थित शेतकरी व कृषी अधिकारी यांना दशपर्णी अर्क कशा प्रकारे बनविला जातो, याचे प्रत्याक्षिक करून दाखवले. तसेच शेंद्रीय शेती करणारे युवा प्रगतीशील शेतकरी रत्नाकर पाटील ढगे यांच्या सोयाबीन व कपाशी शेतीला भेट देऊन कृषी शास्त्रज्ञ यांनी उपस्थित शेतकरी यांना मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हा कृषी अधीक्षक दत्तकुमार कळसाईत, उपविभागीय कृषी अधिकारी अनिल शिरफुले, कापूस संशोधन केंद्र नांदेडचे पांडागळे, कृषी विज्ञान केंद्र सगरोळीचे चव्हाण, व. ना. कृ. विद्यापीठ परभणीचे सुर्यवंशी, किटक शास्त्रज्ञ बेंद्रे, उपविभागीय कृषी अधिकारी रणवीर, गिते देगलूर, अनिल शिरफुले, तालुका कृषी अधिकारी विकास नारनाळीकर, गुडूप, बालाजी बच्चेवार, दिलीप जाधव, सदा पाटील, शिवाजी मिराशे, बंदेल, बिराडे, श्रीमती गच्चे, यलपडवाड, माधव गुट्टे, तालुका कृषी अधिकारी सदानंद पोटपेलवार, मंडळ कृषी अधिकारी दशरथ शिंदे, कृषी पर्यवेक्षक लक्ष्मण हंडे, अनिल वडजे, कापशीकर, जोंधळे, देशमुख, श्रीमती कोपनर आदी कृषी अधिकारी कर्मचाऱ्यांसह शेतकरी संभाजी ढगे, व्यंकटराव ढगे, अच्युत ढगे, उत्तम ढगे, ओम भालके, ज्ञानोबा येवले, चांदू जामगे, पत्रकार गणपत जामगे, रामेश्वर पवार, संदेश ढगे, हरिचंद्र ढगे, भुजंग ढगे आदींसह पारडी येथील शेतकरी गटातील महिलांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

## दलित वस्तीच्या निधीतून दलित वस्तीचीच काम करावे, अन्यथा आंदोलनाचा इशारा



**उमरी (प्रतिनिधी)–** पुर्नवसित गावांच्या विकासासाठी शासनाकडून निधी दिला जातो. असाच दलित वस्तीचा निधी भायगाव ग्रामपंचायतीला मिळाला असून तो इतरत्र वापरला जात आहे. दलित वसतीच्या निधीतून दलित वस्तीचीच काम करावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा गावकऱ्यांच्यावतीने निवेदनाद्वारे देण्यात आला.

उमरी तालुक्यात गोदावरी काठालगत पुनर्वसित असलेल्या भायगाव गावाच्या विकासासाठीही निधी आला. परंतु दलित वस्तीतील विकास कामाला बगल देत आम्हाला वंचित ठेवल्याची तक्रार येथील नागरिकांनी केली आहे. दलित वस्तीचा निधी दलित वस्तीतील कामांसाठी वापरावा अन्यथत्त आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे कुलदीप वाघमारे, गौतम वाघमारे, खंडू वाघमारे, पुंडलिक मल्हारी, हनमंते मालू, भिमराव वाघमारे, मोतीराम वाघमारे, भास्कर वाघमारे, चंद्रकांत वाघमारे, पांडुरंग वाघमारे आदींनी दिला आहे.

## आदिवासी सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी प्रशिक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)–** आदिवासी उमेदवारांसाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र किनवट या प्रशिक्षण केंद्रात येत्या १ ऑगस्ट २०२५ पासून विविध स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी उमेदवारांना प्रवेश देण्यात येणार आहेत. या प्रशिक्षण सत्रात नोकऱ्यांसाठी विविध स्पर्धा परिक्षांची तयारी करून घेण्यात येते. पात्र इच्छूक आदिवासी (अनुसूचित जमातीचे) उमेदवारांनी ३० जुलै, २०२५ पर्यंत शैक्षणीक व जातीचे प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह अर्ज करावेत, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी किनवट यांनी केले आहे.

या प्रशिक्षण सत्रात नौकऱ्यासाठी द्याव्या लागणाऱ्या विविध स्पर्धा परिक्षेची तयारी करुन घेण्यात येते तसेच आदिवासी उमेदवारांसाठी राबविण्यात येणाऱ्या इतर खात्याच्या स्वयंरोजगार योजनांची माहिती देवून मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रशिक्षण केंद्रात १ ऑगस्ट २०२५ पासून सुरू होणाऱ्या ११२ व्या प्रशिक्षण सत्रात आदिवासी सुशिक्षीत बेरोजगार उमेदवारांना विविध स्पर्धा परीक्षेची तयारीसाठी प्रवेश देण्यासाठी उमेदवारांनी ३० जुलै, २०२५ तत्पुर्वी या कार्यालयास पोहचतील अशा बेताने आदिवासी (अनुसूचीत जमातीचे ) उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज करण्यासाठी या पत्त्यावर आदिवासी उमेदवारांकरीता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या बाजूस गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड नि. कोड-४३१८११, संपर्क दुरध्वनी क्रमांक ०२४६९-२२१८०१/ ७२१९७ ०९६३३, ९४२३७ ४८००८ वर संपर्क करावा, असेही कळविले आहे.

या प्रवेशाच्या अटी पुढीलप्रमाणे आहेत. उमेदवार अनुसूचित जमाती पैकी (एस.टी.) प्रवर्गातील असावेत. नांदेड जिल्ह्यातील व इतर जिल्ह्यातील उमेदवारांचाही प्रवेशासाठी विचार करण्यात येइल. उमेदवार कमीत कमी शालांत परीक्षा उतीर्ण असावेत, उच्च शैक्षणिक पात्रतेस प्राधाण्य देण्यात येईल. उमेदवारांनी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, कार्यालयात नाव नोंदणी केलेली असावी. उमेदवारांनी किनवट येथे स्वत: रहाण्याची व जेवणाची व्यवस्था स्वखर्चाने करावी लागेल. प्रशिक्षण कालावधी ३ महीने १५ दिवस असून शालांत परीक्षा उतीर्ण उमेदवारांना तसेच पदवी धारकांना दरमहा १ हजार रुपये विद्यावेतन दिले जाईल. वयोमर्यादा - उमेदवाराचे वय ३० जुलै, २०२५ रोजी १८ वर्ष पुर्ण असावे व ३५ पेक्षा जास्त नसावे. प्रशिक्षणार्थिचे विद्यावेतन संबंधीत प्रशिक्षणार्थिचे बँक खात्यामध्ये दरमहा जमा करण्यात येणार असल्यामूळे प्रशिक्षणार्थिंचे बँक खाते चालू असणे आवश्यक आहे. आपण यापुर्वी अशाप्रकारचे प्रशिक्षण घेतलेले असल्यास किंवा सदर प्रशिक्षण सत्र अर्ध्यातुन सोडलेले असल्यास प्रवेश देण्यात येणार नाही असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## लोहा येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंतीची कार्यकारिणी जाहीर

**लोहा (प्रतिनिधी)–** साहित्य अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह जुना लोहा येथे बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी पांडुरंग विठ्ठलराव दाढेल हे होते. यावेळी जयंती मंडळाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

यामध्ये अध्यक्षपदी राजेश दाढेल लोहेकर, उपाध्यक्षपदी मनोज भिसे, सचिव मनोज उफाडे, सहसचिव उद्धव कंधारे, कोषाध्यक्ष देवीचंद पिसोळे, सदस्य दत्ता वाघमारे, सुर्यकांत कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.

वरील बैठकीस, चांदु पाटोळे, रवी भालेराव, पांडुरंग कंधार, मिलिंद वाघमारे, संदीप सावळे, बाजीराव जाधव, सुधाकर कांबळे, संदीप सावळे, गणेश दाढेल, श्रीधर दाढेल, चंद्रकांत धोगडे, नागेश भालेराव, माजी नगरसेवक अनिल दाढेल, भारत दाढेल, शाम दाढेल, आकाश खानपटे, आशीतोष दाढेल, राहुल दाढेल, प्रसाद दाढेल, सखाराम भिसे, सुनिल दाढेल यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुंत्रसचालन नंदु दाढेल व आभार प्रदर्शन अनिल दाढेल यांनी केले.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी ॲग्रिस्टॅक शेतकरी ओळखपत्र क्रमांक अनिवार्य

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम सन २०२५-२६ राबविण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. ही योजना नांदेड जिल्ह्यात भारतीय कृषी विमा कंपनी पत्ता : मुंबई क्षेत्रीय कार्यालय, लोक चेंबर्स, मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र- ४०० ०५९ ई-मेल : pikvimaaicofindia.com या विमा कंपनी मार्फत राबविण्यात येणार आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेत ३१ जुलै २०२५ पर्यंत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

ही योजना नांदेड जिल्ह्यातील अधिसूचित केलेल्या ज्वारी, मुग, उडीद, तूर, सोयबीन व कापूस या पिकांसाठी केवळ अधिसूचित क्षेत्रासाठी लागू असेल. प्रधानमंत्री पीक विमा योजना कर्जदार, तसेच, बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये सहभागासाठी शेतकऱ्यांना ओळखपत्र क्रमांक (अग्रिस्टॅक फार्मर आयडी) असणे अनिवार्य आहे.

शासनाच्या ११ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक (फार्मर आयडी) १५ एप्रिल २०२५ पासून अनिवार्य करण्यात आलेला आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजना सन २०२५-२६ मध्ये सहभागी होण्याकरीता ॲग्रिस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक (फार्मर आयडी) बंधनकारक राहील. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपले आधार कार्ड, आधार लिंक असलेला मोबाईल क्रमांक, सातबारा उतारा (जमिनीचा दाखला) घेऊन नजीकच्या सीएससी सेंटर (कॉमन सर्व्हिस सेंटर)च्या/ सहकार्याने आपली नोंदणी पूर्ण करावी व आपला शेतकरी ओळखपत्र क्रमांक (फार्मर आय.डी.) प्राप्त करुन घ्यावा. नोंदणीसाठी काही अडचण उद्भवल्यास संबंधीत गावचे तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक यांची मदत घ्यावी.

ॲग्रीस्टॅकची नोंदणी पूर्णतः मोफत आहे. कोणतेही शुल्क भरण्याची गरज नाही. कृषी विकास योजना, पी एम किसान निधी, पीक विमा, नैसर्गिक आपत्तीत नुकसान भरपाईचा लाभ मिळण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक सक्तीचा आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी या योजनेंतर्गत नोंदणी करावी व तसेच प्रधानमंत्री पिक विमा योजनेत ३१ जुलैपर्यंत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

## ढोकी येथे महिलांची विनाअनुदानित सोयाबीन शेतीशाळा



**नांदेड (प्रतिनिधी)–** कृषी विभागामार्फत नांदेड तालुक्यातील मौजे ढोकी येथे सोयाबीन पिकाचे महिलांचे विनाअनुदानित शेती शाळेत शेतीशाळेचे आयोजन तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या शेतीशाळेत सध्याच्या हवामान बदलामुळे सोयाबीन पिकावर होणाऱ्या परिणामांविषयी, तसेच कीड-रोग व्यवस्थापन या विषयी शेतीशाळा आयोजित करण्यात आली होती.

ज्यात महिला आणि पुरुष शेतकरी दोन्ही सहभागी झाले होते. हा या शेतीशाळेचा दुसरा वर्ग होता आणि तो यशस्वीरित्या पार पडला. शेतीशाळेत आयपीएम/आयसीएम निरीक्षणे: शेतकऱ्यांच्या गटांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन पीक परिसंस्थेचा अभ्यास केला. या अभ्यासात पिकांवरील कीड आणि रोगांचे निरीक्षण करण्यात आले. या निरीक्षणांवर गटांमध्ये सखोल चर्चा घडवून आणण्यात आली, ज्यामुळे शेतकऱ्यांनी एकमेकांचे अनुभव आणि ज्ञान वाटून घेतले. चर्चेअंती निष्कर्षांवर आधारित फवारणीविषयी योग्य मार्गदर्शन करण्यात आले, जेणेकरून शेतकरी योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने फवारणी करू शकतील. सेंद्रिय कीटकनाशक निर्मितीः शेतकऱ्यांना निंबोळी अर्क आणि दशपर्णी अर्क यांसारखे घरगुती आणि सेंद्रिय कीटकनाशके कसे तयार करावेत, याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. हे पर्यावरणासाठी अनुकूल असून, रासायनिक फवारणीचा वापर कमी करण्यास मदत करते.

सदर शेती शाळेमध्ये शेतकरी गटे आणि शेतकरी उत्पादक कंपनी स्थापना करणे, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क इत्यादी जैविक निविष्ठा तयार करण्यासाठी गाव स्तरावर जैविक निविष्ठा केंद्र स्थापना करणे, ऊस पिकाचे पाचट व्यवस्थापन, फळबाग लागवड क्षेत्रात वाढ करणे, होस्ट फार्मरचे शेतावर पक्षी थांबे, पिवळे निळे चिकट सापळे, जैविक निविष्ठाचा वापर, जास्तीत जास्त शेतकऱ्यांची वाट गावस्तरीय व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये समावेश करणे, शेतीचे आधुनिक तंत्रज्ञानासाठी महाविस्तार ॲप्स वापर करणे, पाणी फाऊंडेशन डिजिटल शेती शाळाचा लाभ घेणे इत्यादी विषयी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड यांनी मार्गदर्शन केले.

सांघिक खेळः शेवटी, 'पावसाची टाळी' या सांघिक खेळाने शेतीशाळेची सांगता करण्यात आली, ज्यामुळे महिला शेतकरी व शेतकरी बांधवांत एकोपा आणि उत्साह निर्माण झाला. या शेतीशाळेला कृषी विभागाचे अनेक अधिकारी उपस्थित होते. तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल, मंडळ कृषी अधिकारी तवर, उपकृषी अधिकारी नागुरे, सहायक कृषी अधिकारी श्रीमती मोरताडे यांची उपस्थिती होती. या शेतीशाळेमुळे शेतकऱ्यांना आधुनिक आणि शाश्वत शेती पद्धतींबद्दल माहिती मिळाली असेल, ज्यामुळे त्यांची शेती अधिक फायदेशीर आणि पर्यावरणपूरक बनण्यास मदत होते.

# युवा

# ताटातूट का?

**फेसबुक- इंस्टाग्रामवरून झालेल्या ओळखीतून मैत्री व नंतर तरुण-तरुणी एकमेकांच्या प्रेमात पडतात. त्यानंतर काही दिवसांतच प्रेमविवाह करण्याचा निर्णय घेतात. कुटुंबाचा विरोध झुगारून लग्न करतात. परंतु, वर्षभराच्या आतच दोघांमध्ये कुरबूर होते आणि प्रेमविवाह ताटातूट होण्याच्या मार्गावर येते.**

फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअॅप, टिंडर, डेटिंग साईट्सवरून अनेक तरुण-तरुणी एकमेकांशी मैत्री करतात. काही शिक्षण घेताना किंवा परिसरातील तरुण-तरुणींशी मैत्री करतात. मैत्रीतून लगेच काही दिवसांतच त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण होतात. एकमेकांवर पैसे खर्च करणे, सिनेमा, हॉटेल, महागडी खरेदी सुरू होते. एकमेकांना वेळ देण्यात येतो. काही तरुण- तरुणी लग्नाबाबत कुटुंबीयांशी चर्चा करतात तर काही थेट न्यायालयातून नोंदणी विवाह किंवा पळून जाऊन लग्न करण्याचा निर्णय घेतात. कुटुंबीयांच्या विरोधाला झुगारून दोघेही प्रेमविवाह करतात. प्रेमविवाहानंतर केवळ सहा महिने ते वर्षभरात दोघांतील संबंधात दुरावा निर्माण होते. दोघांचेही प्रेम कमी होते आणि थेट एकमेकांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतात.

**प्रेमविवाहानंतरच्या तक्रारींची आकडेवारी** (ऑगस्टपर्यंत)
- वर्ष.......तक्रारी
- २०२२ .......५५३५
- २०२३.......६८६८
- २०२४.......५६८५
- २०२५.......४५८५

## आता मला बंधन नकोय

प्रियकर-प्रेयसीचे नाते चांगले होते. लग्न झाल्यानंतर मोठ्या जबाबदाऱ्या वाढल्या आहेत. सासू-सासरे आणि पतीने नातेवाईकांचेही नखरे सहन करावे लागतात. प्रियकराचा पती झाल्यानंतर तो पूर्वीसारखा वेळ देत नाही, पहिल्यासारखे प्रेम उरले नाही. त्याला आता माझी गरज नाही. त्याच्या मनात कुणीतरी दुसरी असावी, म्हणून तो माझ्याकडे दुर्लक्ष करतो. आता मला बंधन नकोय, अशा तक्रारी करीत असल्याचे समोर आले आहे.

## वाढत्या अपेक्षांमुळे वाद

लग्न झाल्यानंतर तरुण-तरुणींच्या वागण्यात बदल होतो. सहाजिकच तरुणावर कुटुंबासह पत्नीची जबाबदारी असते. त्यामुळे दोन पैसे कमावण्यावर तो भर देतो. तर याउलट प्रेयसीची पत्नी झाल्यानंतर पतीकडून जास्त अपेक्षा असतात. त्यामुळे त्यांच्या नव्या संसारात खटके उडण्याचे प्रमाण जास्त आहे.

## जोडीदाराकडून अवाजवी अपेक्षा

# नात्यावर पडेल संकटाची छाया



**कोणतेही नाते हे प्रेम आणि समजुतीने तसेच जोडीदाराकडून असलेल्या अपेक्षांनी बांधलेले असते. पण जोडीदाराकडून खूप अपेक्षा ठेवणे किंवा आपल्या इच्छेनुसार गोष्टींचा विचार करणे योग्य आहे का? आपल्या जोडीदाराकडून फक्त त्या अपेक्षा असायला हव्यात ज्या तो पूर्ण करू शकेल आणि ज्या वाजवीही असतील. तथापि, कधी कधी इच्छा नसतानाही आपल्या जास्त अपेक्षा असतात. यामुळे आपण एकतर स्वतःला दुखी करतो किंवा समोरच्याला. त्यांच्या आयुष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ द्यायची नाही, ही बाब लक्षात ठेवणं गरजेचं आहे. यामुळे विनाकारण नात्यात दुरावा निर्माण होऊ लागतो आणि रोजचा कलह होतो. आम्ही तुम्हाला अशाच चार अपेक्षांबद्दल सांगणार आहोत, जेणेकरून तुमच्या जोडीदारासोबतचे तुमचे नाते नेहमी आनंदी आणि मजबूत राहावे...**

- जोडीदार परिपूर्ण असावा : कोणीही परिपूर्ण नसतो हे खरे आहे. अशा परिस्थितीत, कोणत्याही नातेसंबंधात प्रवेश करण्यापूर्वी आणि नंतरa आपला जोडीदार परिपूर्ण असावा अशी अपेक्षा करणे म्हणजे स्वतःसाठी दुःखाचे दरवाजे उघडण्यासारखे आहे. जर तुमचे तुमच्या जोडीदारावर मनापासून प्रेम असेल तर त्यांना जसे आहे तसे स्वीकारा. कमतरतांऐवजी तुमच्या जोडीदाराच्या बलस्थानांकडे अधिक लक्ष द्या. जेव्हा तुम्ही प्रेम आणि परस्पर सामंजस्याने पाऊल टाकून पुढे जाल तेव्हा नाते आपोआपच परिपूर्ण वाटेल.
- होय होय होकार : काही लोक नेहमी स्वतःला योग्य समजतात. अशा स्थितीत आपल्या जोडीदाराने ते जे काही बोलतील किंवा करतील तेच करावे अशी त्यांची अपेक्षा असते. इतकंच नाही तर त्यांनी काही बोललं तर त्यांच्या जोडीदाराने ते मान्य करावं अशी त्यांची अपेक्षा असते. सत्य हे आहे की ते विषारी आणि नियंत्रित वर्तन दर्शवते. कोणीही अशा नकारात्मक वृत्तीने जगू इच्छित नाही.
- काहीही न बोलता एखाद्याच्या भावना जाणून घेणे : प्रत्येकाला समजूतदार जोडीदार हवा असतो, पण समजून घेण्याऐवजी, काहीही न बोलता त्याला अथवा तिला तुमचे विचार कळतील अशी अपेक्षा करणे योग्य नाही. अनेकदा असे दिसून येते की लोक त्यांचा राग आणि प्रेमदेखील दाबतात. कोणताही शब्द न बोलता तुमच्या जोडीदाराने तुमच्या मनातील या गोष्टी समजून घ्याव्यात अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. यामुळे नात्यात गैरसमजांचे जाळे निर्माण होऊ शकते, जे भविष्यात दूर होऊ शकत नाही. त्यामुळे तुमच्या मनातील गोष्टी मोकळेपणाने शेअर करा. तुम्हाला काय हवे आहे किंवा तुम्हाला काय त्रास देत आहे ते त्यांना सांगा. हे कोणत्याही परिस्थितीत तुमच्या नात्यात गैरसमज होऊ देणार नाही.

### जोडीदार तुमच्यासारखा असावा

लोकांना एकमेकांपासून वेगळे करणारी गोष्ट म्हणजे त्यांचे वागणे आणि हीच गोष्ट सर्वांना आकर्षितही करते. अशा परिस्थितीत तुमचा जोडीदार तुमच्यासारखाच असावा अशी अपेक्षा करणे किंवा तेच गुण असलेल्या व्यक्तीची वाट पाहणे चुकीचे आहे. काही गोष्टी सारख्या असू शकतात पण त्या सारख्याच असण्याची अपेक्षा करणे योग्य नाही. लक्षात ठेवा की तो तुमचा पार्टनर आहे, कार्बन कॉपी नाही. म्हणूनच, आशा करू नका की कालांतराने आपण त्यांना आपल्यासारखे बनवाल. उलट, त्यांना तुमच्यासारखे बनवण्याचा तुमचा वारंवार प्रयत्न नातेसंबंध विस्कळीत होण्यास भाग पाडेल.



# लग्न ठरण्यापूर्वी कुठं व्हावं दोघांचं एकमत?

**नातेसंबंधात पैशाबद्दल बोलणे चांगले मानले जात नाही, परंतु पैसाच खूप महत्वाचा आहे. लग्नानंतर या विषयावर बोलून नात्यात कटुता निर्माण करण्यापेक्षा लग्नाआधी या विषयावर मनमोकळेपणाने आणि अर्थपूर्ण संवाद साधलेला बरा. तुमचा खर्च आणि बचत करण्याच्या सवयी किती समान आहेत हे तुम्ही दोघांनाही जाणवेल...**



- तुम्हाला मूल हवे आहे की नाही? : आजकाल जोडपी लग्नापूर्वी उघडपणे बोलतात की त्यांना मूल हवे आहे का? जर होय, तर किती वर्षांनी? याविषयी तुम्ही तुमच्या भावी जोडीदाराशीही बोलले पाहिजे, जेणेकरून उद्या कौटुंबिक दबाव आला तर तुमच्या दोघांमध्ये या विषयावर भांडण होणार नाही. मुलांबाबत तुमच्यामध्ये जो काही करार झाला असेल, गरज भासल्यास, त्याबाबत दोन्ही कुटुंबांना माहिती दिल्यास तुमचे जीवन शांत राहील.
- पालकांसह किंवा एकटे राहा : लग्नाआधी तुम्ही हे सुनिश्चित केले पाहिजे की तुम्ही दोन्ही पालकांसोबत राहणार आहात की एकटे. यामुळे तुम्ही दोघेही मानसिकदृष्ट्या तयार व्हाल. तसंच, लग्नानंतर तुम्ही आई-वडिलांसोबत राहत नसलात, तरी तुमच्या पालकांना आर्थिक पाठबळ देण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे का, यावरही चर्चा व्हायला हवी.
- या दोघांचे करिअरचे ध्येय काय असेल? : अनेक नोकरी करणाऱ्या मुली लग्नानंतर नोकरी सोडतात. तुम्ही तुमच्या जोडीदाराशी बोलले पाहिजे की तुम्हाला दुसऱ्या शहरात किंवा देशात चांगली नोकरी मिळाली तर त्यालाही तुमच्यासोबत यायला आवडेल का? की दोघेही दोन वेगवेगळ्या शहरात राहतील आणि काम करतील?

# आयुष्याला मिळेल नवे वळण...

## एकटेपणा दूर करणाऱ्या ५ टिप्स जाणून घ्या...



**जीवनाच्या धावपळीत स्वतःची काळजी घेणे सर्वात महत्वाचे आहे. मनाला काय हवे आहे याचा विचार करून स्वतःला आनंदी ठेवावे लागते. पण अनेकदा शहरी जीवनात माणूस अडकून पडल्याचे दिसून येते. आयुष्य ऑफिस ते घर आणि घर ते ऑफिस मर्यादित होत जाते. ना कोणाला भेटायचे, ना कोणाला मित्र बनवायचे, ना जीवनाचा शोध घेण्याचा विचार. या गोष्टी आपल्याला एकाकीपणाकडे घेऊन जातात. हे टाळण्याचा विचार करावा. एकटेपणामुळे वाढणारी निराशा मनावर घेऊ नये. अशा परिस्थितीत आम्ही तुम्हाला काही उत्तम टिप्स सांगणार आहोत, ज्या तुमच्यासाठी केवळ मजेदारच नसतील तर तुमचे आयुष्यही बदलून टाकतील. मग तुमचा प्रत्येक दिवस नव्या उमेदीने सुरू होईल...**

- लोकल अॅक्टिव्हिटी आणि गटांमध्ये सामील व्हा : एकटेपणाला सामोरे जाण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे आपल्याला स्वारस्य असलेल्या लोकल अॅक्टिव्हिटी ग्रुपमध्ये सहभागी होणे. त्यासाठी तुम्हाला हवे असल्यास शहरातील कोणत्याही क्लब किंवा ग्रुपमध्ये सहभागी होऊ शकता. जर तुम्हाला पाळीव प्राणी, नृत्य, वाचन किंवा चालणे आवडत असेल तर तुम्ही हे देखील करू शकता. कारण या उपक्रमांमुळे लोकांमध्ये मिसळण्याची संधी मिळते.
- स्वयंसेवक बनून समाजात सामील व्हा : स्वयंसेवक सेवा हा समाजाशी जोडण्याचा आणि समाजासाठी सकारात्मक योगदान देण्याचा एक उत्तम मार्ग आहे. या काळात तुम्हाला तुमच्यासारखे विचार करणारे लोक भेटतात. अशा परिस्थितीत, तुम्ही प्राणी निवारा, फूड बँक किंवा पर्यावरण गट यासारख्या स्थानिक संस्थांचा शोध घ्यावा. एकटेपणाशी लढताना रोजची स्वयंसेवक सेवा आयुष्याला एक नवा अनुभव देईल.
- सोशल मीडियाचीही मदत घ्या
- सोशल मीडियामुळे कधीकधी एकटेपणा वाढू शकतो, तरीही इतरांशी संपर्क साधण्यासाठी हे एक चांगले व्यासपीठ आहे. अशा परिस्थितीत नेटवर्किंग वाढवण्यासाठी तुम्ही सोशल मीडिया ग्रुप्समध्ये सामील होऊ शकता किंवा तुम्ही त्या अकाऊंटला फॉलो करू शकता. ज्यावरून तुम्हाला शहरात घडणाऱ्या घटनांची माहिती मिळू शकते. मग तुम्ही या ग्रुप्सच्या मीटअप्स किंवा इव्हेंट्समध्ये सामील व्हाल. परंतु ऑनलाइन आणि ऑफलाइन संभाषणांमध्ये समतोल असावा हे लक्षात ठेवा.
- तंत्रज्ञानाचाही उपयोग होईल
- आजच्या डिजिटल युगात, अनेक अॅप्स आणि प्लॅटफॉर्म्स आहेत जे तुम्हाला मित्र शोधण्यात आणि सहजतेने सामाजिक बनण्यास मदत करू शकतात. ते तुम्हाला अशा लोकांशी जोडतात जे तुमच्यासोबत मनोरंजक गोष्टी शेअर करतात आणि तुम्हाला शहरातील नवीन सामाजिक संधी शोधण्यात मदत करतात. दूर राहणाऱ्या कुटुंबातील सदस्यांशी संपर्कात राहण्याचा व्हिडिओ कॉल करणे हा देखील एक चांगला मार्ग आहे.
- स्वतःची काळजी आणि माइंडफुलनेस
- शहरी जीवनात स्वतःला नेहमी निरोगी आणि आनंदी ठेवण्यासाठी, तुम्हाला मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या मजबूत असणे आवश्यक आहे. अशा स्थितीत मनाला आराम देणारी एखादी क्रिया करावी. ज्यासाठी तुम्ही ध्यान, योग करू शकता किंवा पुस्तक वाचू शकता. याशिवाय, स्वतःला सुधारणे आणि सामाजिक जीवनात सक्रिय राहण्याचे ध्येय घेऊन पुढे जा.

# ५ इशारे...

## वेळीच समजून घ्या!

**जेव्हा एखादे जोडपे एकमेकांबद्दल गंभीर असते, तेव्हा त्यांचे नाते लग्नाच्या टार्गेटवर नेणे त्यांच्यासाठी सामान्य आहे. पण अनेक वेळा असंही घडतं की एखादा मुलगा लग्नाची इच्छा दाखवतो, पण त्याची मैत्रीण हे नातं अंतिम वचनबद्धतेच्या मार्गावर येऊ देत नाही. यामागे अनेक कारणे दडलेली आहेत. यातील काही कारणे अशी आहेत की ती कालांतराने सोडवली जातात, परंतु काही प्रकरणांमध्ये वास्तविकता अशी आहे की मुलीने आपल्या प्रियकराशी लग्न करण्याचा विचार कधीच केला नव्हता. काही लक्षणांच्या मदतीने हा प्रकार वेळीच समजून घेतल्यास, कोणीही स्वतःला दुखापत होण्यापासून वाचवू शकतो.**

- नेहमी एक निमित्त तयार असते : तुम्ही लग्नाचा थोडा जरी उल्लेख केला तरी लगेच तिच्याकडे काहीतरी निमित्त तयार असते. कधी ती तिच्या करिअरबद्दल, कधी तरुण वयाबद्दल, कधी कुटुंबाबद्दल तर कधी आणखी कशाबद्दल बोलते. तिची यादी इतकी लांब आहे की त्यांच्याशी स्पर्धा करणे कठीण होते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती हे सर्व बहाणे अतिशय भावनिक पद्धतीने मांडते, ज्यामुळे तुम्ही स्वतः लग्नाची चर्चा पुढे ढकलता.



- तिला तुमच्या कुटुंबाला भेटण्याची इच्छा नाही : तुम्ही तुमच्या नात्याबद्दल इतके गंभीर आहात की तुम्हाला तुमच्या प्रेयसीची तुमच्या कुटुंबीयांशी आणि मित्रमंडळींशी ओळख करून द्यायची आहे, पण तुमच्या तिला त्यात रस नाही. ती नेहमी आता नाही, अजून काही वेळ, आता अजून थोडा वेळ घालवायला हवा, ही खूप घाई होईल अशा गोष्टी बोलताना दिसते.
- त्यांच्या भविष्यातील योजनांमध्ये तुम्हाला स्थान नाही : करिअर असो किंवा आयुष्याचा इतर कोणताही भाग, जर त्याच्या भविष्यातील कोणत्याही योजनांमध्ये तुम्हाला स्थान नसेल, तर हे स्पष्टपणे दर्शवते की त्याचे संपूर्ण आयुष्य तुमच्यासोबत घालवण्याचा त्याचा कोणताही हेतू नाही.
- लग्नाबाबत ती नकारात्मक बोलते : ती नेहमी लग्नाच्या विषयावर फक्त आणि फक्त नकारात्मक बोलते, मग ती दुसऱ्याच्या वैवाहिक जीवनाबद्दल बोलत असेल किंवा त्याच्याशी लग्न करण्याची मनापासून इच्छा व्यक्त करत असेल. अशा वेळी त्यांना लग्नाच्या बांधिलकीत रस नाही हे काचेप्रमाणे स्पष्ट होते.
- ती तुमच्यासोबत असतानाही ती दुसऱ्यामध्ये स्वारस्य दाखवते : ती तुमच्याबरोबर आहे पण इतर मुलांमध्ये स्वारस्य दाखवणे तिच्यासाठी सामान्य आहे. ती तुमची तिच्याशी तुलना करायलाही थांबत नाही. अशा मुली लग्नासारख्या वचनबद्धतेपासून मागे हटणे पसंत करतात.

# जोडीदाराचा तुमच्यावर विश्वास नसेल तर...

**पती-पत्नीच्या नात्यात विश्वासाचा अभाव निर्माण झाला की त्यांच्यात मतभेद निर्माण होतात आणि हळूहळू नातं तुटतं. पती-पत्नीमधील विश्वासच त्यांचे नाते अनेक दशकांपर्यंत टिकवून ठेवू शकतो. पण कधीकधी वाईट अनुभवांमुळे लोक कोणावरही पटकन विश्वास ठेवू शकत नाहीत. जेव्हा तुमचा पार्टनर फसवतो तेव्हा त्याच्यावर अथवा तिच्या पाठीवर विश्वास ठेवणे कठीण होते. अशा परिस्थितीत नात्यात पुन्हा विश्वास निर्माण करण्यासाठी काय करायला हवे ते आम्ही तुम्हाला सांगत आहोत...**



- मोकळेपणाने बोला : पती-पत्नीमध्ये विश्वास प्रस्थापित करण्यासाठी मुक्त संवाद अत्यंत आवश्यक आहे. तुमचे विचार, भावना आणि चिंता तुमच्या जोडीदारासोबत शेअर करा. तुमच्या जोडीदाराचे काय म्हणणे आहे ते काळजीपूर्वक ऐका आणि त्यांच्या भावना समजून घ्या. तसेच, तुमच्या भावना आणि चिंता त्यांच्याशी शक्य तितक्या हळूवारपणे शेअर करा.
- विश्वास न ठेवण्याचे कारण शोधा : जर तुमच्या जोडीदाराचा तुमच्यावर विश्वास नसेल तर त्यामागे काहीतरी कारण असावे. अशा परिस्थितीत तो तुमच्यावर विश्वास का ठेवत नाही हे जाणून घेण्यासाठी त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करा. यामागे तुमच्याकडून झालेली चूक किंवा त्यांच्या भूतकाळात घडलेली काही घटना आहे का? हे जाणून घेतल्यावरच तुम्ही योग्य दिशेने प्रयत्न करू शकाल.
- तुमची वचनबद्धता गांभीर्याने घ्या : एक विश्वासार्ह व्यक्ती अशी आहे जी आपल्या वचनबद्धतेला गांभीर्याने घेते. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या जोडीदाराला दिलेले वचन पूर्ण करण्याचा प्रयत्न करा, मग ते कितीही लहान असो वा मोठे. जर तुम्ही त्यांना मुदतीच्या आत काही काम करण्याचे आश्वासन दिले असेल, तर वेळ संपण्यापूर्वी ते पूर्ण करा.

### गोष्टी लपवणे टाळा

पती-पत्नीच्या नात्यात पारदर्शकता असणे अत्यंत गरजेचे आहे. जेव्हा तुमचा पार्टनर तुमच्यावर विश्वास ठेवत नाही तेव्हा गोष्टी लपवणे विशेषतः धोकादायक असते. अशा परिस्थितीत जोडीदारासोबत प्रत्येक लहान-मोठी गोष्ट शेअर करा. तुमच्या हेतूंबद्दल त्यांच्या मनात कधीही प्रश्न उद्भवू नयेत यासाठी प्रयत्न करा. जेव्हा गरज असेल तेव्हा त्यांचे गैरसमज हळूवारपणे दूर करा.

# ‘निस्तार’ भारतीय नौदलात दाखल

## पहिले स्वदेशी पाण्याखालील मदतकार्य करणारे जहाज



**विशाखापट्टणम (प्रतिनिधी)** – 'निस्तार' हे स्वदेशी रचना आणि निर्मिती असणारे पाण्याखाली उतरून मदतकार्य करणारे पहिलेच जहाज हिंदुस्तान शिपयार्ड लिमिटेडने विशाखापट्टणम येथे भारतीय नौदलाकडे सुपूर्द केले.

या युद्धनौकेची रचना आणि बांधणी भारतीय नौवहन नोंदणीच्या(आयआरएस) वर्गीकरण नियमांनुसार करण्यात आली आहे. हे जहाज अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण बनावटीचे असून ते खोल समुद्रात उतरून बचाव कार्य करू शकते. जगभरातील निवडक नौदलांमध्ये अशा क्षमतेची जहाजे आहेत.

या जहाजाचे 'निस्तार' हे नाव संस्कृत भाषेतून निवडले असून त्याचा अर्थ मुक्ती, बचाव किंवा तारणहार असा होतो. सुमारे १०,००० टन वजनाचे आणि ११८ मीटर लांबीचे हे जहाज अत्याधुनिक डायव्हिंग उपकरणांनी सुसज्ज आहे आणि ३०० मीटर खोल समुद्रात डायव्हिंग करण्याची क्षमता त्यात आहे. या जहाजात ७५ मीटर खोल समुद्रात जाऊन बचावकार्य करण्यासाठी बाजूला साईड डायव्हिंग मंच देखील आहे.

हे जहाज डीप सबमर्जन्स रेस्क्यू व्हेसल (डीएसआरव्ही) साठी महत्वाचा आधार,'मदर शिप' म्हणून देखील काम करु शकेल, जे पाण्याखाली पाणबुडींमध्ये आपत्कालीन परिस्थितीत अडकलेल्या कर्मचाऱ्यांना वाचवण्यासाठी आणि बाहेर काढण्यासाठी वापरले जाऊ शकते. १००० मीटर खोलीपर्यंत डायव्हर मॉनिटरिंग आणि बचाव कार्य करण्यासाठी हे जहाज रिमोटली ऑपरेटेड व्हेइकल्सचे नियोजन करण्यासाठी देखील सुसज्ज आहे.जवळजवळ ७५% स्वदेशी सामग्रीसह निस्तारचे दाखल होणे ही भारतीय नौदलाच्या स्वदेशी बांधकामाच्या शोधात आणखी एक अभिमानास्पद पाऊल आहे आणि भारत सरकारच्या ‘आत्मनिर्भर भारत’ आणि ‘मेक इन इंडिया’ मोहिमेच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

# शिक्षण उपसंचालक संदीप सांगवे निलंबित

## विधानसभा परिसरात ५ कोटी घेऊन फिरत असल्याचा आरोप

**मुंबई (प्रतिनिधी)** शिक्षण विभागात एक महापॉवरफुल अधिकारी मागील तारखा टाकून लाखो रुपये उचलत असल्याचा आरोप भाजप आमदार संजय उपाध्याय यांनी केला. संजय उपाध्याय यांनी मुंबई शिक्षण उपसंचालक संदीप सांगवे यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले आणि त्यांच्या विरोधात लक्षवेधी उपस्थित केली. त्यानंतर शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी संदीप सांगवे यांना निलंबित केल्याची घोषणा केली.

भाजपचे आमदार संजय उपाध्याय यांनी मुंबई शिक्षण उपसंचालक संदीप सांगवे यांच्यावर गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, महापॉवरफुल अधिकारी माझ कोणी काही करू शकत नाही असं वारंवार बोलून दाखवतो. मागील तारखा टाकून लाखो रूपये उचलत शेकडो फाईल मंजूर केल्या आहेत. या अधिकाऱ्याने शासनाच्या तिजोरीचं कोट्यवधी रूपयांचं नुकसान केलं आहे.

संदीप सांगवे यांची लक्षवेधी लागली तर याचे अनेक दलाल माझ्याकडे आले. ही लक्षवेधी सभागृहात मांडूच शकणार नाही असं खुलं आव्हान मला या अधिकाऱ्यानं दिलं होतं असं संजय उपाध्यय म्हणाले. ते म्हणाले की, महापालिकेतील अधिकारी माझ्यावर रेकी करत होते. एकही आमदार माझ्या विरोधात काही करू शकणार नाही अस वारंवार आव्हान दिलं गेलं. चौकशी चालू असताना या अधिकाऱ्यानं सरसकट चुकीच्या मान्यता दिल्या.

संदीप सांगवे हा अधिकारी १३ वर्षे एकाच खात्यात आहे. माझ्याविरोधात प्रश्न विचारू नका, तुमचं सगळं काम करून देतो अशी थेट ऑफर करतो. हा इतका पावरफुल अधिकारी कसा काय? असा प्रश्न यावेळी संजय उपाध्यय यांनी विचारला.

संदीप सांगवे हा अधिकारी अख्खी विधानसभा ताब्यात घेण्यासाठी दोन-पाच कोटी घेऊन फिरतोय अशी चर्चा सुरू आहे असा गौप्यस्फोट यावेळी आमदार रणधीर सावरकर यांनी केला. त्यावर एका आठवड्याच्या आत चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल असं शिक्षणमंत्री दादा भुसे म्हणाले. या उत्तरावरून सभागृहात गोंधळ झाल्याचं पाहायला मिळालं.

# दिल्ली एनसीआर आणि हरियाणात भूकंप

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** दिल्ली एनसीआरमध्ये गुरुवारी सकाळी भूकंपाचे धक्के जाणवले. हरियाणाच्या काही भागांनाही भूकंपाचे धक्के जाणवले. सकाळी नऊ वाजून चार मिनिटांनी भूकंपाचा धक्का जाणवला. भूकंपाचा केंद्रबिंदू हरियाणातील झज्जर येथे होता. दिल्ली एनसीआरला ४.४ रिश्टर क्षमतेच्या भूकंपाचा धक्का जाणवला. या भूकंपामुळे जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

भूकंपामुळे जमिनीखाली १० किमी. आतपर्यंत जमीन हादरल्याची नोंद भूकंपमापन केंद्राने केली आहे. संपूर्ण दिल्ली एनसीआर तसेच हरियाणा आणि पंजाबच्या काही भागांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवल्याची नोंद भूकंपमापन केंद्राने केली. अनेक ठिकाणी दहा सेकंद जमीन हादरत होती. भूकंप झाल्यावर काही ठिकाणी नागरिक खबरदारीचा उपाय म्हणून इमारतीमधून बाहेर मोकळ्या जागेत आले होते.

दुसरीकडे, कोल्हापूरच्या राधानगरी तालुक्यात ऑनलाइन गेममुळे एका शेतकऱ्याचे ५ लाख रुपये बुडाले. शेतकऱ्याने म्हशी खरेदीसाठी बँक खात्यात ७ लाख रुपये साठवले होते. मात्र, त्यांच्या सहावीत शिकणाऱ्या मुलाने ‘फ्री फायर’ गेम खेळताना ॲप डाउनलोड केले आणि काही क्षणातच खात्यातील ५ लाख रुपये गायब झाले. सायबर पोलिसांनी ट्रान्झेक्शन आयडीच्या आधारे तपास केला. यापूर्वी कोल्हापुरात डिजिटल अरेस्टमुळे साडेतीन कोटी आणि आठ कोटींची फसवणूक झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. या घटनांमुळे पालकांना मुलांना मोबाईल देताना सावधगिरी बाळगण्याचा इशारा मिळाला आहे.

## दर्शनाला आलेल्या भाविकांच्या वाहनाचा अपघात; चौघांचा मृत्यू

**इगतपुरी (प्रतिनिधी)** – गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने इगतपुरी तालुक्यात दर्शनाला आलेल्या भाविकांच्या वाहनाचा भीषण अपघात झाला आहे. नाशिक मुंबई महामार्गावरील मुंढेगाव फाट्यावर झालेल्या ह्या भीषण अपघातात २ महिला आणि २ पुरुष असे ४ जण जागीच ठार झाले आहे.

भाविकांच्या इको वाहनाला सिमेंट पावडर घेऊन जाणाऱ्या कंटेनरने पुढे फरफटत नेल्याने हा अपघात झाला. इको वाहनातील चार जणांचा दाबल्याने जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. अपघातग्रस्त सर्व रहिवासी अंधेरी मुंबई येथील असल्याचे समजते.

क्रेनच्या सहाय्याने गाडीखाली दबलेले मृतदेह बाहेर काढण्यास सुरुवात करण्यात आली आहे. महामार्गावर काही प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे. जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थान नानिज धाम मोफत रुग्णवाहिकेचे रुग्णमित्र निवृत्ती पाटील गुंड यांनी समयसुचकतेने अपघातस्थळी दाखल होऊन मदत कार्य केले. घोटी पोलीस, महामार्ग पोलीस, टोल नाक्याची टीम घटना स्थळी दाखल झाली आहे. अपघात ग्रस्त भाविक मुंढेगावजवळ रामदास बाबा यांच्या मठात गुरुपौर्णिमेसाठी आले होते.

## ‘भारतीय डाक’च्या नावाने लिंक पाठवून डॉक्टरच्या खात्यातून ८८ हजार ७९० लंपास

**मुंबई (प्रतिनिधी)**–पनवेलमध्ये एका डॉक्टरला 'भारतीय डाक'च्या नावाने आलेल्या लिंकवर क्लिक केल्याने फसवणूक झाली. त्यांच्या खात्यातून ८८,७९० रुपये काढले. डॉक्टरांनी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. पोलिस सायबर चोरट्यांचा शोध घेत आहेत. नागरिकांनी अशा लिंक्सवर क्लिक करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

पनवेलमध्ये एका डॉक्टरला सायबर चोरट्यांनी गंडा घातला. 'भारतीय डाक'च्या नावाने लिंक पाठवून त्यांच्या खात्यातून ८८,७९० रुपये उडवले. ही घटना ४ जुलै रोजी घडली. डॉक्टरला आलेल्या एका मेसेजमधील लिंकवर क्लिक केल्याने हे घडले. पनवेल शहर पोलिसांनी अज्ञात सायबरचोरावर गुन्हा दाखल केला असून ते या प्रकरणाचा तपास करत आहेत. पनवेलमधील एका डॉक्टरला ऑनलाईन फसवणूक झाली. त्यांना 'भारतीय डाक'च्या नावाने एक मेसेज आला. या मेसेजमध्ये एक लिंक होती. या लिंकवर क्लिक केल्यावर त्यांच्या डेबिट कार्डची माहिती चोरली गेली. यामुळे त्यांच्या बँक खात्यातून ८८,७९० रुपये काढले गेले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉक्टर हे पनवेलच्या तक्का भागात राहतात. ४ जुलै रोजी सायंकाळी त्यांना एक मेसेज आला. या मेसेजमध्ये त्यांच्या पार्सल डिलिव्हरीबद्दल माहिती होती. त्यांना नेहमी पार्सल येत असल्यामुळे त्यांनी त्या लिंकवर क्लिक केले. लिंकवर क्लिक केल्यावर 'भारतीय डाक'च्या नावाने एक बनावट वेबसाईट उघडली. या वेबसाईटवर २५ रुपये भरण्यास सांगितले. तसेच त्यांची वैयक्तिक माहिती आणि डेबिट कार्डची माहिती भरण्यास सांगितली. डॉक्टरने सर्व माहिती भरली आणि आलेला ओटीपी टाकला.

त्यानंतर, आणखी एक ओटीपी टाकण्यास सांगितला. दुसरा ओटीपी टाकल्यावर त्यांच्या खात्यात कमी पैसे असल्याचा मेसेज आला. त्याच क्षणी त्यांच्या खात्यातून ८८,७९० रुपये काढल्याचा मेसेज बँकेकडून आला. त्यानंतर आपल्या खात्यातून कुणीतरी सदर रक्कम काढून घेतल्याचे लक्षात आले, असे डॉक्टरने सांगितले.

## महाराष्ट्र शासनाचे २२ वर्षे मुदतीचे १,५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई (प्रतिनिधी)**–: महाराष्ट्र शासनाच्या २२ वर्षे मुदतीच्या १,५०० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादिपर्यंत वाटप करण्यात येईल.

१५ जुलै, २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् १५ जुलै, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर प्रणालीनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर प्रणालीनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान १६ जुलै, २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

# शालेय पोषण आहारात किडलेले कडधान्य, सडलेले टोमॅटो; पालकांचा संताप





**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**– फुलंब्री तालुक्यातील पिंपळगाव वळण येथील जिल्हा परिषद शाळेत मंगळवारी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहारामधील मसाले भात मेन्यूत सडलेले टमाटे वापरण्यात येणार होते; पण ग्रामस्थांनी वेळेवर येऊन तो प्रकार थांबवला. या वेळी पालकांनी संताप व्यक्त करून गट शिक्षणाधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली.

पिंपळगाव वळण येथे जिल्हा परिषदची पहिली ते आठवीपर्यंत शाळा आहे. येथे १०५ विद्यार्थी शिक्षण घेतात. शासनाच्या शालेय पोषण आहार धोरणानुसार, पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. हा शालेय पोषण आहार अधिक रुचकर व्हावा म्हणून शालेय शिक्षण विभागाने आठ दिवसांपूर्वीच या पोषण आहारामध्ये तीन नवीन मेन्यू देण्याचा निर्णय घेतला. असे असताना पिंपळगाव वळण शाळेत मात्र विद्यार्थ्यांना सडलेले टमाट्यांपासून बनवलेला आहार दिला जात असल्याचे उघडकीस आले.

शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या नियमानुसार, मंगळवारी मसालेभात देण्याचा नियम आहे. मंगळवारी दुपारी १२च्या दरम्यान काही ग्रामस्थ शाळेत आले. त्यांनी शालेय पोषण आहारात दिल्या जाणाऱ्या साहित्याची पाहणी केली असता, त्यामध्ये सडलेले टमाटे, कीड लागलेली मटकी, वाटाणे; तसेच चवळीमध्ये अळ्या आढळल्या. याबाबत त्यांनी संताप व्यक्त केला. केंद्रप्रमुख साबळे यांना फोनवर माहिती दिली असता त्यांनी शाळेत येऊन पाहणी केली. या प्रसंगी ग्रामस्थ योगेश शिरसाठ, जुबेर इनामदार, जयसिंग वहाटुळे, राहुल वहाटूळे, उत्तम वहाटूळे, अशोक वहाटूळे, राहुल खंडागळे, खयुम इनामदार, संतोष जाधव, रामेश्वर वहाटूळे, अक्षय खंडागळे आदींनी शिक्षण विभागाकडे तक्रार नोंदवली आहे. याबाबत बुधवारी शिक्षणाधिकारी क्रांती धसवाडीकर, शिक्षण विस्तार अधिकारी राजेश महाजन यांना पिंपळगाव वळण शाळेला भेट देऊन पाहणी केली. त्यात शाळेला मे महिन्याच्या सुट्ट्या लागण्याअगोदरचे काही धान्य उरलेले होते. त्यास कीड लागलेली होती; परंतु ते धान्य यात वापरले नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. एक तारखेला नव्याने धान्य, मसाले साहित्य खरेदी केलेलेच साहित्य वापरत होतो, असेही सांगण्यात आले. याचा सविस्तर खुलासा जिल्हा परिषदेकडे देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## फळबागांच्या नुकसान भरपाईसाठी क्रॉप कव्हर योजना– कृषीमंत्री ॲड.कोकाटे

**मुंबई(प्रतिनिधी)** वातावरणातील बदलामुळे फळबागांचे नुकसान होत असून फळबागांच्या नुकसान भरपाईसाठी क्रॉप कव्हर योजना राबविण्यात येणार असल्याची माहिती कृषीमंत्री ड.माणिकराव कोकाटे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

विधानसभा सदस्य रोहित पाटील यांनी अवकाळी पावसामुळे द्राक्ष पिकांवर होणारे परिणाम या विषयासंदर्भात विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेत सदस्य हेमंत ओगले, अभिजीत पाटील यांनी उपप्रश्न विचारून सहभाग घेतला.

कृषीमंत्री श्री. कोकाटे यांनी सांगितले, वातावरणातील बदलाचा फळबागांवर परिणाम होत असल्याने द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना संकटाचा सामना करावा लागतो. द्राक्ष बागांवर हवामान बदलाचा प्रभाव कमी करण्यासाठी राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे यांच्या माध्यमातून सातत्याने निरीक्षण व सल्ला देण्यात येत आहे. द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच एक बैठक आयोजित केली जाईल आणि बैठकीमध्ये विमा कंपनीच्या प्रतिनिधींनाही बोलवले जाईल. राज्यात द्राक्ष पिकाखाली एक लाख २३ हजार ४२४ हेक्टर क्षेत्र असून सुमारे २४ लाख ८९ हजार २६८ मे. टन उत्पादन होते. नाशिक, सांगली, सोलापूर, अहिल्यानगर आणि धाराशिव या जिल्ह्यात द्राक्ष पिकाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते.


### टी.सी हरवली

मी अमोल अच्युतराव भुजबळ राहणार धानोरा ता लोहा येथिल रहिवासी असून धानोरा ते लोहा येत असताना माझी कागदपत्राची बॅग हरवली असून त्यामध्ये टीसी आधार कार्ड फोटो पॅन कार्ड सर्व कागदपत्राची बॅग हरवली आहे कुणाला मिळाल्यास खालील पत्त्यावर द्यावी.**–संपर्क पत्ता–अमोल अच्युतराव भुजबळ राहणार धानोरा ता लोहा जि नांदेड मो. नंबर ८८०६७२७२४७**

### Change In Name

My Old Name is SHAIKH MOHAMMAD YASEEN which now I am changing as New Name SHAIKH MOHAMMAD YASEEN SHAIKH ABDUL MUQEEM Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.ADD-:H.N.1-7-890 PEER NAGAR SHASTRI NAGAR ROAD TARODA BK NANDED 431605 MO.8308509199

### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

### टी.सी हरवली

माझी कु. वेदिका तुकाराम कदम या नावाची पंचशील विद्यालय हदगांव येथून काढलेली बारावी पासची टीसी बस प्रवासामध्ये हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी.

**संपर्क पत्ता:–**
**कु. वेदिका तुकाराम कदम**
**मु. पो. रुई ता. हदगांव**
**जि. नांदेड**

### टी.सी हरवली

माझी बारदे ओमकार माधवराव या नावाची दहावी उत्तीर्ण असलेली टीसी व मार्कमेमो शंकरनगर ते नरसी बस प्रवासात हरवली आहेत तरी कोणाला सापडल्यास आणून द्यावे योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**–संपर्क पत्ता–**
**बारदे ओमकार माधवराव**
**मु.पो. धानोरा तमा,ता. नायगाव, जि. नांदेड**

### त्वरीत विकणे आहे

आमचे गजानन महाराज मंदीर जवळ तसेच नांदेड लातूर मेन रोडला लागून मुसलमानवाडी जवळ १३ शॉपचे बांधकाम झालेले कॉम्पलेक्स ३ साईड रोड असलेले साईज २०० बाय १०० किंवा १०० बाय १०० सहा दुकानासहित योग्य दरात त्वरीत विकणे आहे.

**संपर्क नंबर**
**८२७५५१०००६/९७६५४४३३११**

### जाहीर प्रगटन

मौजे टेळकी ता.लोहा जि. नांदेड हद्दीतील शेत गट नंबर ६४५ मधील पुर्ण ४० आर शेतजमिन सदाशिव शामराव हबर्डे रा.टेळकी ता.लोहा जि.नांदेड यांचेकडून १.कांताबाई सदाशिव हबर्डे रा.टेळकी ता.लोहा जि.नांदेड २.किशन शामराव हबर्डे रा.टेळकी ता.लोहा जि.नांदेड यांच्या संमतीने काळेश्वर शामराव हबर्डे रा.विष्णूपुरी नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

शेतजमिनीची चुर्तसिमा पुर्वेस-विशाल भानुदास देशमुख यांचे शेत, पश्चिमेस- किशन शामराव हबर्डे यांचे शेत, दक्षिणेस-दिगांबर शंकरराव मोरे यांचे शेत,उत्तरेस -जिजाबाई गणेशराव मोरे यांचे शेत

स्थित मौजे टेळकी ता.लोहा जि.नांदेड

वरील शेत जमिनी बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर शेत जमिनीचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**काळेश्वर शामराव हंबर्डे**
**रा.विष्णूपुरी नांदेड मो.९६५७७३४३०७**

### जाहीर प्रगटन

मी अडवोकेट आसिफ खान पि.अल्ताफ इलाही खान,रा.निजाम कॉलनी ता.जी.नांदेड सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळवितो कि,माझे वडील अल्ताफ इलाही खान पि. अहमद खान गट क्र.१९३ तुप्पा नांदेड क्षेत्रफळ १० हेक्टर ९१ आर या जमिनीचे नोंदणीकृत खरेदीखत आधारे मालक व काबीजदार आहे. माझ्या वडिलांचे सदर जमिनी बाबत वकील म्हणून मी विविध न्यायालयात विविध अर्ज व याचिका व अपील व जाहीर प्रगटन सॅन २०१९ पासून दाखल करत आहे व वाद युक्तिवाद व इतर सर्व न्यायालयीन काम पाहत आहे. सदर जमिनी बाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे ड/४७/२०१८ मध्ये जैसे थे आदेश माझ्या वडिलांचे हक्कात आहे. तसेच सदर जमिनीचा फेरफार क्र. ७५०९ जो माझ्या वडिलांचे नावे होता तो बेकायदेशीर रित्या रद्ध करून त्या जागी बेकायदेशीर फेरफार क्र. ८०८३ एका मरण पावलेल्या व्यक्तीचा नाव टाकून केल्यामुळे फेरफार क्र. ८०८३ मध्ये नमूद ०९ व्यक्तींविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे दि.३०/०३/२०२४ रोजी गुन्हा क्र.०२६१ नुसार भा.द.वि ४२० व इतर २२ कलमांप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. त्या गुन्हा क्र.०२६१/२०२४ मध्ये पुरावा नाही म्हणून जे समरी रिपोर्ट पोलीस उपनिरीक्षक यांनी दाखल केले होते ते मा.मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयाने दि.३१/०५/२०२५ रोजी फेटाळलेले आहे व ९० दिवसात आरोपीं विरुद्ध दोषारोपत्र दाखल करण्यासाठी आदेश केलेले आहे. मला असे माहीत झालेले आहे कि आरोपी व भाऊ बंधू व इतर भामटे व षडयंत्र रचणारे माझ्या बाबत सदर जमिनीच्या संदर्भात काहीही अफवा व खोटी माहिती पसरवत आहे कि सदर जमिनीचे मी सौदा चिठ्ठी वगैरह केलेले आहे असे खोटी माहिती पसरवून आरोपी व भाऊ बंधू व इतर भामटे माझ्या विरुद्ध षडयंत्र रचत आहे. सदर जमिनीबाबत मी कोणाशीही कोणत्याही प्रकारचा सौदा वगैरह केलेला नाही. तरी सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनद्वारे कळविण्यात येते कि मी माझ्या वडिलांचा पुत्र म्हणून व त्यांचा वकील म्हणून उचित निर्णय घेण्याच्या अधिकार ठेवतो व मी व माझ्या वडिलांनी जमीन गट क्र.१९३ तुप्पा नांदेड क्षेत्रफळ १० हेक्टर ९१आर बाबत कोणाशीही कोणतेही सौदा चिट्ठी खरेदीखत व इतर कोणतेही व्यवहार केलेले नाही. तसेच सदर जमिनीच्या बेकायदेशीर फेरफार क्र.८०८३ / ७/१२ मध्ये नमूद ०९ आरोपींसोबत व भाऊ बंधू व इतर भामटे सोबत कोणतेही सौदा चिट्ठी व इतर कोणतेही व्यवहार करू नये, केल्यास ते स्वतः जबाबदार राहील व ते फौजदारी प्रक्रिये व दिवाणी न्यायालयाचे प्रक्रिये प्रमाणे उचित कार्यवाहीसाठी पात्र ठरतील व जबाबदार राहील. सबब हे जाहीर प्रगटन दि.११/०७/२०२५.

जाहीर प्रगटन देणार:अडवोकेट आसिफ खान पि. अल्ताफ इलाही खान. मो.९११३०४४९४००.

### जाहीर प्रगटन व जाहीर आक्षेप

माझे पक्षकार व पिता श्री.अल्ताफ इलाही खान पि. अहमद खान रा.निजाम कॉलनी,ता.जी.नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे व जाहीर आक्षेपद्वारे कळविण्यात येते कि, माझा मुलगा आरिफ खान पि. अल्ताफ इलाही खान जो कि त्याच्या कुटुंबासह ऑस्ट्रेलिया देशात स्थित आहे याने दि.०५ जुलै २०२५ रोजी दै.प्रजावाणी व दै.वरक ए ताजा मध्ये जाहीर प्रगटन दिलेले आहे की त्याने मला दि.२३/०८/२००२ रोजी दिलेले जनरल पावर आफ़ अटार्नी(GPA) क्र.२६५३/२००२ हे रद्द केलेले आहे. सदर जनरल पावर आफ़ अटार्नी(GPA) क्र. २६५३/२००२ ही स.दु.नि.कार्यालय नांदेड येथे नोंदणीकृत करण्यात आलेले आहे म्हणुन कायद्यानुसार ते एक तर्फे जाहीर प्रगटन देऊन रद्द करता येत नाही. तसेच त्या GPA आधारे आरिफ खान याच्या नावाने असलेली कोणतीही मिळकत मी आतापर्यंत विक्री केलेले नाही, उलट माझ्या स्व कष्टाने कमावलेले काही मिळकत ती GPA क्रम २६५३/२००२ आधारे आरिफ खान याला मी गिफ्ट केलेली आहे व रउफ कॉलनी सांगवी नांदेड येथील एक मजली मकान आरिफ खान याच्या नावे खरेदी क्र.४११६/२०१७, स.दु.नि. ०१ नुसार मी खरेदी केलेली आहे. जर ते GPAक्र. २६५३/२००२ रद्द झालेले असेल तर आरिफ खान याला मी करून दिलेले काही प्लॉटचे गिफ्ट व रउफ कॉलनी सांगवी नांदेड येथील एक मजली मकानची मालकी ही आरिफ खानच्या नावाने रद्द समजण्यात यावी. जसे त्या GPA २६५३/२००२ आधारे आरिफ खान याच्या नावे काही मिळकत मी गिफ्ट व खरेदी केलेली आहे तसेच त्या GPAक्र. २६५३/२००२ आधारे आरिफ खान याच्या नावे असलेले ते गिफ्ट व खरेदीला रद्द करण्याचे किंवा इतर कोणालाही ते गिफ्ट किंवा विक्री करण्याचे मला पूर्ण अधिकार आहे. माझा मुलगा आरिफ खान व ईरफान खान यांच्या कृत्यामुळे मला दुःख व मानसिक त्रास झालेला आहे. मा.उच्च न्यायालयच्या एका आदेशान्वये जो मुलगा आपल्या पालकां विरूद्ध कट कारस्थान किंवा षड्यंत्र किंवा त्यांना त्रास देत असेल त्या मुलाला करून दिलेले गिफ्ट परत घेण्याचे संपूर्ण अधिकार पालकांना आहेत. तरी या जाहीर प्रगटन व जाहीर आक्षेप द्वारे सर्व जनतेस व संबंधितांना वर नमुद तथ्य कळविण्यात येते. सबब हे जाहीर प्रगटन व जाहीर आक्षेप दि.११/०७/२०२५.

**जाहीर प्रगटन देणार पक्षकार व पिता: अल्ताफ इलाही खान पि.अहमद खान.**

**पक्षकाराचे अधिवक्ता व पक्षकाराचा मुलगा: ॲड. आसिफ खान पि.अल्ताफ इलाही खान. मो.न.९११३०४४९४००.**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट, पहिला मजला, शिवाजी नगर, नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## कामगार कुटुंबियांनी शिक्षण, आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा –जिल्हाधिकारी

**नांदेड (प्रतिनिधी)**–कामगारांच्या कुटुंबियांनी शासनाच्या शिक्षण आणि आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. आज जिल्हा प्रशासनाच्यावतीने नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत कामगार बांधवांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच असंघटित क्षेत्रातील कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी कामगारांची नोंदणी व आरोग्य शिबीर कार्यक्रमाचे आयोजन वाजेगाव नोबल फंक्शन हॉल येथे केले होते. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, कामगार कल्याण सहाय्यक आयुक्त अनिकेत थोरात, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण मुंडे, नायब तहसीलदार सुनिल माचेवाड, संजय नागमवाड, वाजेगावचे सरपंच जमील सेठ आर्दीची उपस्थिती होती.



वंचित, उपेक्षित घटकांना शासनाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचाव्यात, त्यांना त्या योजनांचा लाभ प्रत्यक्ष मिळावा यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच उपक्रमाच्या माध्यमातून आज कामगारांच्या नोंदणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हा जिल्हा प्रशासनाचा स्तुत्य उपक्रम असून, या शिबिराच्या माध्यमातून महिला, असंघटित कामगार यांना आरोग्य, शिक्षणासह इतर विविध सुविधांचा लाभ एकाच ठिकाणी देण्यात येत आहे. या शिबिराचा त्यांनी लाभ घ्यावा, असेही आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी केले.

या शिबिरात कामगारांचा नोंदणी स्टॉल, आयुष्यमान कार्ड स्टॉल, आरोग्य शिबीर स्टॉल असे विविध योजनांचे स्टॉल लावण्यात आले होते. या शिबिरात महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. तसेच सीएससी सेंटर चालकांनी या शिबिरात नोंदणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे.

या शिबिरात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी आरोग्यविषयक माहिती देऊन महिलांनी आपली तपासणी करुन घ्यावी असे सांगितले. तसेच त्यांनी महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. कामगारांना मिळणाऱ्या शासनाच्या विविध योजनेची माहिती देवून कामगार आयुक्त अनिकेत थोरात यांनी मार्गदर्शन केले.

या शिबिरात महिला व पुरुष असे एकूण ४९१ रुग्णांची तपासणी करण्यात आली. तर रक्त तपासणी १५६ रुग्णांची करण्यात येवून, १६ रुग्णांची ईसीजी तपासणी करण्यात आली. १४५ लोकांना आयुष्यमान कार्ड वितरीत करण्यात आले तर २२५ कामगारांची ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्यात आली. या शिबिरात एकूण १ हजार ३३ लाभार्थ्यांना विविध लाभ देण्यात आले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत भार्गव करिअर अकॅडमीचे विद्यार्थी महाराष्ट्रात अग्रेसर; राज्यस्तरावरील गुणवत्ता यादीत पहिल्या १० मध्ये २७ विद्यार्थी चमकले

**नांदेड (प्रतिनिधी)** – मागील दशकात संपूर्ण राज्यात नावलौकिक मिळवणाऱ्या नांदेड येथील भार्गव करिअर अकॅडमी या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत महाराष्ट्रात यशाची पताका फडकविली आहे. इयत्ता आठवीत राज्याच्या गुणवत्ता यादीत पहिल्या १० क्रमांकात भार्गव अकॅडमीचे तब्बल २७ विद्यार्थी असून, हा एकप्रकारे विक्रम मानला जातो. याशिवाय इयत्ता पाचवीच्या परीक्षेत जिल्हास्तरावर अन्य १९ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता प्राप्त केली.

राज्यस्तरावर जाहीर झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीत पहिल्या १० विद्यार्थ्यांत पहिले, दुसरे विद्यार्थी तसेच चार विद्यार्थी क्रमांक ३ ने, तीन विद्यार्थी क्रमांक ४ ने, दोन विद्यार्थी पाचव्या क्रमांकाने, पाच विद्यार्थी ६ व्या क्रमांकाने, चार विद्यार्थी ७ व्या क्रमांकाने, चौघे नवव्या क्रमांकाने आणि ३ विद्यार्थी दहाव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. अर्थात पहिल्या १० क्रमांकात आठवा क्रमांक वगळता उर्वरित सर्व स्थानावर 'भार्गव'च्या तब्बल २७ विद्यार्थ्यांनी ठसा उमटवला. हे विद्यार्थी इंग्रजी माध्यमाचे असून ३ मराठी माध्यमाचे विद्यार्थी चमकले. जवळपास अर्धी गुणवत्ता यादी भार्गव करिअर अकॅडमीने काबीज केली आहे. इयत्ता पाचवीत इंग्रजी माध्यमाचे चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, त्यांच्यात स्पर्धा करण्याची जिद्द वाढीस लागावी, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा या हेतूने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने दरवर्षी इयत्ता पाचवी व आठवी वर्गासाठी शिष्यवृत्ती परीक्षांचे आयोजन करण्यात येते. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील परीक्षा फेब्रुवारीमध्ये पार पडल्या. त्याचा निकाल बुधवारी (दि. ९) जाहीर झाला आहे.

इयत्ता आठवी सीबीएसई माध्यमाच्या परीक्षेत एकूण २७ विद्यार्थी चमकले असून ६० जणांच्या गुणवत्ता यादीत पहिले सात विद्यार्थी भार्गव करिअर अक्ॅडमीचे आहेत. याशिवाय अन्य २० विद्यार्थ्यांनी या यादीत स्थान मिळवले. राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमाच्या आधारे परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांमध्ये २ विद्यार्थी शहरी भागातून तर एक विद्यार्थी ग्रामीण भागातून चमकला.

**इयत्ता आठवीचे गुणवंत**

अनन्या बापूराव गुरफळकर (स्टेट रँक १), संचित रमाकांत बोरगावे (०२), तन्वी शिवाजी कौठेकर (०३), निनाद रवीकुमार बर्डे (०३), अजित मुंजादेव मुंडे (०३), स्पर्श संजय शिप्परकर (०३), सृष्टी शिवहर किडे (०४), प्रथमेश प्रकाश पांचाळ (०४), सदाशिव संतोष केसराळे (०४), अक्षरा बसवण्णा बरबडे (०५), आदित्य संजय मोग्गावार (०५), काव्या कैलास दमकोंडवार (०६), प्रत्युषकुमार पवनकुमार महतो (०६), अर्णव ऋषिकेश बर्डे (०६) स्वयम विवेकानंद सूर्यवंशी (०६), विवेक ज्ञानोबा सूर्यवंशी (०६), सर्वेश साहेबराव शिंदे (०७), सन्नी रेड्डी दली चन्नारेड्डी (०७), राशी रितेशसिंह बिसेन (०७), आरुष ज्ञानेश शेरीकर (०७), दर्शन गणेश पाठक (०९), शिवम मनोजकुमार आंदुरे (०९), ऋतुराज बालाजी देशमुख (०९), देवेश निलेश दिग्रसे (०९), वेदिक सुरेश दुडले (१०), आदित्य अनिल शिरफुले (१०), वेदांत विवेक मोतेवार (१०).

याशिवाय राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमात शहरी भागातून अरुण ईश्वर लिंगदळे (स्टेट रँक १०) व काव्या संजय इंगळे (१२) या गुणानुक्रमे उत्तीर्ण झाले. ग्रामीण भागातून शिवेंद्रराज अजय पाटील याने राज्याच्या गुणवत्ता यादीत १० वा क्रमांक मिळवला. इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत इंग्रजी माध्यमातून आर्यन चंद्रकांत देवसरकर (स्टेट रँक ०४), युवराज शिवराज वडजे (११), नाव्या आशय देशमुख (११) तर देवेंद्र शिंदे याने राज्याच्या गुणवत्ता यादीत १३ वा क्रमांक पटकावला. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक भार्गव करिअर अकॅडमीचे संचालक भार्गव राजे व अन्य शिक्षकवृंदांनी केले.

## ज्येष्ठ पत्रकार वानखेडे यांचे रविवारी व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)** – प. पू. स्वामी रामानंद तीर्थ स्मृती व्याख्यानमालेचे यंदापासून आयोजन करण्यात आले आहे.



भारतीय लोकशाहीचे भवितव्य या विषयावर ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखेडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन रविवार दि. १३ रोजी संध्या. ६ वा. नियोजन भवन सभागृह येथे करण्यात आले आहे, अशी माहिती निमंत्रक प्रा. डॉ. यशपाल भिंगे व महेश देशमुख तरोडेकर यांनी दिली आहे.

हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे प्रणेते प. पू. स्वामी रामानंद तीर्थ स्मृती व्याख्यानमालेचे यंदाचे प्रथम वर्ष आहे.

## मराठवाडा शिक्षक संघाच्यावतीने जुनी पेन्शन व शंभर टक्के अनुदानासाठी जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन



**नांदेड (प्रतिनिधी)** – सर्वांनाच जुनी पेन्शन लागू करावी व राज्यातील निकषपात्र विनाअनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सूत्रानुसार अनुदान द्यावे, राज्यातील खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण व यथानियम वेतन देण्यात यावे या व इतर मागण्यांच्या पुर्ततेसाठी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून निवेदन देण्यात आले.

या आंदोलना मागच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे-अंशदायी पेन्शन योजना रद्द करून सर्वांनाच जुनी पेन्शन योजना लागू करावी, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त, परंतु नंतर १००% अनुदानावर आलेल्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना इतर राज्य सरकारी कर्मचाऱ्या- प्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करण्याची कार्यवाही ताबडतोब करावी, राज्यातील निकषपात्र विनाअनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सूत्रानुसार १००% अनुदान देण्यात यावे, राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना यथानियम वेतन व सेवासंरक्षणाचे सेवानियम लागू करण्यात यावेत, राज्यातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १०, २०, ३० अशा तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, १० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांवर कंत्राटी शिक्षक भरतीचा शासनादेश रद्द करावा यासह इतर २३ मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत पाठवण्यात आले आहे.

याप्रसंगी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने संघटनेचे सहसचिव सौ. रेखा सोळुंके, जिल्हाध्यक्ष व्ही. आर, चिलवरवार, आनंद मोरे, विजयालक्ष्मी स्वामी, आर. पी. वाघमारे, जयवंत शिंदे, मोहन पिनाटे, अब्दुल हसीब, राम यडते, बाबाराव घाटे, दत्ता कोम्पलवार, डी. एम. पाटील, आतनूरकर, आनंद सुरसे, विनोद भुताळे, मुख्याध्यापक संघटनेचे गजभारे, शिक्षकेतर संघटनेचे पी. आय. पेंडकर, उत्तम लाटकर, इसादकर, नाझिया कौसर, सुलताना मॅडम, मधुकर वानखेडे, सुरेश ईदलवार, अतनूरकर, पुरणे, अनिल सुगावकर, गजानन घोरबांड, डी.जी धनगरे, एम जी तेलंग, यांच्यासह शिक्षक भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते



**नांदेड** – गुरूद्वारा बचाओ संघर्ष समितीच्यावतीने नांदेड गुरूद्वारा कायदा १९५६ चे कलम रद्द करण्यात यावे या मागणीसाठी मुंबई येथील आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्यासाठी समाजाचा जत्था मुंबईकडे रवाना झाला. यावेळी सचखंड गुरूद्वाराचे संत बाबा कुलवंतसिंघ दिसत आहेत. जरनैलसिंघ गाडीवाले यांच्या नेतृत्त्वात हा जत्था रवाना झाला. रघबिरसिंघ बासरीवाले, मनींदरसिंग रामगडीया, जसबिरसिंघ बुंगई, महेंदरसिंघ पैदल यांच्यासह आदी.

## एलसीबीच्या कारवाईत एका पिस्तूलसह चोरीच्या तीन दुचाकी जप्त; दोन्ही आरोपी सराईत गुन्हेगार



**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरात विनापरवाना पिस्तूल जवळ बाळगून परिसरात दहशत पसरविण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे यांच्या टीमने अटक केली. या दोन्ही चोरट्यांकडून चोरीच्या तीन दुचाकी, एक पिस्तूल आणि दोन जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई मालटेकडी परिसरात १० जुलै रोजी करण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत तसेच अवैध (पिस्तूल) बाळगणाऱ्या आरोपींची माहिती काढून कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत आणि गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेशीत केले होते.

त्यावरून श्री. खंडेराय यांनी अधिनस्त अधिकारी व अंमलदार यांना पोलीस अधीक्षक यांच्या आदेशाप्रमाणे कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

त्यावरून दिनांक ९ जूलै रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांनी गुप्त माहिती घेतली. आरोपी अंकुश रामदास भगत याने वेगवेगळया ठिकाणी मोटार सायकल चोरी केल्याची खात्रीशिर माहिती मिळाल्यावरून सदर आरोपीचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने सोनखेड तसेच भाग्यनगर, नांदेड हद्दीत ३ मोटार सायकल चोरी केल्याचे सांगितले. त्याच्या ताब्यातुन चोरी केलेल्या स्प्लेंडर प्लस कंपनीच्या ३ मोटार सायकल जप्त करून सदर आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव पोलीस स्टेशन सोनखेड यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## महिलेवर अत्याचार करणाऱ्यास दहा वर्षांची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)** – शेतात काम करणाऱ्या एका महिलेवर बळजबरी अत्याचार करणाऱ्या ३५ वर्षीय व्यक्तीला येथील अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश आर. व्ही. कोकरे यांनी १० वर्षे सक्तमजुरी व ५ हजार रुपये रोख दंडाची शिक्षा गुरुवार, दि. १० जुलै रोजी सुनावली.

हदगाव तालुक्यातील तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका २५ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीत ती आणि तिचे पती २० डिसेंबर २०२१ रोजी शेतात काम करण्यासाठी गेले होते. शेतातील मेथीची भाजी उपटून तिच्या जुड्या तयार करून तिने भाजी विक्रेत्याला शेतातच विक्री केली. त्यानंतर त्या महिलेचे पती दुष्काळीचे पैसे जमा झाले की, नाही हे पाहण्यासाठी बँकेत गेले. तेंव्हा त्यांच्या गावातच राहणारा संजय गोविंदराव गाडगे हा पाठीमागून आला व महिलेला पकडून तिच्यासोबत अश्लील वर्तन करू लागला. ती विरोध करताच बळजबरीने तिच्यावर अत्याचार केला. घडलेली घटना परत आलेल्या त्या महिलेच्या नवऱ्याने पाहिली. तेंव्हा तो संजय गोविंद गाडगे हा पळून गेला. यानंतर अनेक नातलगांशी चर्चा करून २१ डिसेंबर २०२१ रोजी याबाबतची तक्रार पोलीस ठाणे तामसा येथे देण्यात आली. तामसा पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा क्रमांक २१२/२०२१ भा.दं. संहितेच्या कलम ३७६ नुसार दाखल केला. सहाय्यक पोलीस निरीक्षक बी. एच. किरवले यांनी संजय गाडगेला पकडले त्याच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. न्यायालयात हे प्रकरण सत्र खटला क्रमांक २१२/२०२१ प्रमाणे चालले. या प्रकरणात सरकार पक्षाच्यावतीने ॲड. मनीकुमारी बत्तुल्ला (डांगे) यांनी सादरीकरण करतांना घडलेल्या घटनाक्रमाबद्दल कायदेशीर दृष्टीकोणातून काय आवश्यक आहे हे सांगितले.

## शासकीय मोफत ऑटोरिक्षा योजनेचे आमिष दाखवून अनेकांना लाखोंचा गंडा

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या तारासिंह मार्केट परिसरात असलेल्या शिवांश कम्युनिकेशन विरुद्ध वजिराबाद पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून, मालक वीरेंद्रसिंह हजारीस अटक केली आहे.

हजारी याने महाराष्ट्र शासनाच्या मोफत ऑटो रिक्षा योजना असल्याचे आमिष दाखवून शहर व जिल्ह्यातील शेकडो सुशिक्षित बेरोजगारांना लाखोंचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अशाच एका प्रकरणातील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अन्नधान्य वाटप योजनेत आरोपीला नुकतेच अटक करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाची मोफत ऑटोरिक्षा योजना अंतर्गत महाराष्ट्रातील सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगार मिळावा व ते कोणावरही अवलंबून राहू नयेत अशी जाहिरात सुशिक्षित बेरोजगारांचे बायोडाटा व काही रक्कम जमा केली होती. या प्रकरणात तब्बल एक वर्षानंतर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. ऑटो चालक विजय तुकाराम मडके राहणार नाथनगर एमजीएम महाविद्यालय परिसर नांदेड याने सदरची जाहिरात वाचून व त्याच्या काही ओळखीचे सचिन जोंधळे, गजानन डुकरे, हरीश कुंडकर, रवी गहलोत यांच्यासह अनेकांनी शिवांश कम्युनिकेशन येथे संपर्क साधून मोफत ऑटो रिक्षा योजनेचा लाभ मिळावा म्हणून पैसे भरले.

या योजनेमध्ये शासनाकडून ९५ टक्के अनुदान मिळणार तसेच ऑटो प्राप्तीच्या वेळी परमिट करून मिळेल असे सांगण्यात आले. त्यानंतर उर्वरित पाच टक्के रक्कम ही ऑटो प्राप्तीवेळी भरावी लागेल असेही सांगण्यात आले. सुरुवातीला या लाभधारकांनी साडेतीन हजार रुपये भरून टप्प्याटप्प्याने जवळपास २६ हजार ५०० रुपये जमा केले. ऑटोरिक्षा नाही व यादीतही नाव नसल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर विजय मडके व त्याच्या अन्य काही साथीदारांनी तारासिंह मार्केट येथे जाऊन वीरेंद्रसिंह हजारी यांना विचारपूस केली. यावेळी त्यांना वुमन्स आणि चाइल्ड डिपार्टमेंटचे ॲप्लीकेशन रजिस्टर नोंदणी पावती ऑनलाइन दाखवली. खरे तर हे कुठल्याच शासकीय विभागाशी टाईप केलेली संस्था नसल्याचे समोर आले. ९ ऑगस्ट २४ रोजी वीरेंद्रसिंह हजारी यांना विचारणा केल्यानंतर त्यांनी या योजनेबद्दल सविस्तर लाभार्थ्याला माहिती दिली. परंतु नंतर अनेकांचे पैसे घेऊन कुठल्याही लाभार्थ्याला मोफत ऑटोरिक्षा देण्यात आली नाही. लायसन्स व १६ नंबर फॉर्म स्वीकारल्याने अनेकांचा यावर विश्वास बसला आणि त्यांची या प्रकरणात फसवणूक झाली. सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू वटाणे आणि लोंढे हे तपास करत आहेत.

## भिवराबाई मोरे यांचे निधन

**नवीन नांदेड** –बाभुळगाव येथील ज्येष्ठ महिला नागरीक भिवराबाई भाऊराव मोरे यांचे



हृदयविकाराच्या झटक्याने ९ जुलै रोजी सकाळी खाजगी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, चार मुली, तीन मुले, नातू, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बाभुळगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. महात्मा गांधी हायस्कूल सिडकोचे सेवानिवृत्त शिक्षक सूर्यभान मोरे यांच्या त्या मातोश्री होत. मनमिळाऊ व शांत स्वभावाच्या अशी त्यांची ओळख होती. त्यांच्या अकाली निधनाने अनेकांनी दुःख व्यक्त केले.

## शिक्षणाधिकारी डॉ. बिरगे यांना निरोप तर श्रीमती फुटाणे यांचे स्वागत



**नांदेड (प्रतिनिधी)**– शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे यांना निरोप तर शिक्षणाधिकारी श्रीमती फुटाणे यांच्या स्वागताचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे यांची बदली परभणी येथे माध्यमिक शिक्षणाधिकारी पदावर तर लेखाधिकारी (वर्ग २) शालेय पोषण आहार योजना दादाराव बुरकुले यांची बदली छत्रपती संभाजीनगर येथे झाल्याने त्यांचा निरोप समारंभ तसेच प्राथमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नांदेड या पदावर नव्यानेच रुजू झालेल्या श्रीमती वंदना फुटाणे यांचा व उपशिक्षणाधिकारी प्राथमिक या पदावर रुजू झालेले नागराज बनसोडे, लेखाधिकारी (वर्ग २) शालेय पोषण आहार योजना या पदावर नव्यानेच रुजू झालेले निळकंठ पाचंगे यांचा स्वागत समारंभ जिल्हा परिषद नांदेडच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये मंगळवारी पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नांदेड अधिकारी - कर्मचारीवृंद यांच्यातर्फे करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली तसेच विशेष अतिथी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) राजकुमार मुक्कावार हे उपस्थित होते.

## लिंबगाव पोलिसांची जुगार अड्ड्यावर कारवाई; ११ जुगाऱ्यांना अटक, तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– लिंबगाव पोलिसांच्या हद्दीत मागील काही महिन्यांपासून सुरू असलेल्या एका जुगार अड्ड्यावर पोलिसांनी कारवाई केली. यावेळी ११ जुगाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून दोन लाख ८९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अवैध धंदे करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याचे आदेश लिंबगाव ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंढरीनाथ बोधनकर यांना दिले होते.त्या अनुषंगाने दि. ९ जुलै रोजी दुपारी चारच्या सुमारास बोधनकर व त्यांचे पथक हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, पडीत गोडाऊन लिंबगाव मोंढा येथे काही इसम अंदर बाहेर नावाचा जुगार खेळत व खेळवित आहेत. या खात्रीशीर माहितीवरून सदर ठिकाणी लिंबगाव पोलिसांनी छापा मारला. तिथे अकरा जुगारी अंदर बाहेर नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना सापडले. त्यांचेकडे नगदी, मोटारसायकल, मोबाईल व जुगाराचे साहित्य असा एकूण २ लाख ८९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशन लिंबगाव येथील पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार यांनी अवैध धंद्यावर कारवाई करुन कामगिरी केल्याने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी लिंबगाव पोलीस पथकाचे कौतुक करुन अभिनंदन केले आहे.

या धाडीत मनोहर कदम, वय २८ वर्ष, सिध्दार्थ गंगाधर वगर, वय ४३ वर्ष, युवराज प्रकाश दुदमल, वय २७ वर्षे, कपिल भगवान आठवले, वय ४० वर्षे, गजानन तुळशीराम पोहरे, वय ३७ वर्षे, राहुल कुंडलिक नरवाडे, वय ४५ वर्षे, गंगाधर भगवान भंडारी, वय २८ वर्षे, भगवान ग्यानोजी वगर, वय ६६ वर्षे, सोनू राजेंद्र वगर, वय वर्षे, नितेश जयकुमार कदम, वय २२ वर्ष, रोहन आदींचा समावेश आहे.

## नारायणराव पिंपरवार यांचे निधन

**किनवट (प्रतिनिधी)**– येथील राजेंद्र नगरातील रहिवाशी, जुन्या पिढीतील व्यापारी



नारायणराव सांबप्पा पिंपरवार यांचे बुधवार, दि. ९ जुलै रोजी रात्री निधन झाले.मृत्यू समयी त्यांचे वय ९३ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, ४ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

पिंपरवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी दि.१० येथील कैलास मोक्षधाम स्मशानभूमीत अंत्य-संस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने अनेकांनी दुःख व्यक्त केले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com